मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २२६ ■ सोमवार, २७ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## संक्षिप्त

### कॉपर केबलची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** कॉपर केबलची चोरी केल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात 23 एप्रिल रोजी तीन अनोळखी ईसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.23 एप्रिल रोजी युफोरिया को-ऑपरेटिव्ह सोसायटी, सेक्टर 16, खारघर या साइटवर मेन गेटच्या आत तीन अनोळखी ईसमानी कॉपर वायरचा 15 मीटरचा रोल चोरी करून नेला. या प्रकरणी खारघर पोलीस अधिक तपास करत आहेत.

### चाळीस लाख साठ हजार रुपयांचे दागिने चोरले

मारहाण करून चाळीस लाख 60 हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेल्याची घटना खारघरमध्ये घडली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात 23 एप्रिल रोजी तीन अनोळखी इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सुशांत नामदेव मोरे (वय 41 राहणार सेक्टर 12 खारघर) हे त्यांच्या घराच्याजवळ एफ लाईन कॉर्नर समोरील रस्त्यावर सेक्टर 12, खारघर या ठिकाणी त्यांचे चालक महेश हाटे, मित्र अभिनंदन हे कार पार्किंग करून पायी चालत चाळीस लाख साठ हजार रुपये किमतीचे दागिन्यांची पिशवी घेऊन मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास घरी जात होते. यावेळी त्यांच्या पाठीमागून आलेल्या तिघांनी सुशांत मोरे यांना चाकूने मारहाण करून जखमी केले तसेच महेश हाटे आणि अभिनंदन यांना हाताने मारहाण केली आणि मोरे यांच्या हातातील 40 लाख 60 हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने असलेली पिशवी जबरदस्तीने घेऊन ते पळून गेले.

# मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवरील घाटाला मिळणार बायपास; ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पाचे 1 मेला उद्घाटन

**मुंबई :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला पूर्णतः ‘ॲक्सेस कंट्रोल’ बनवणाऱ्या महत्त्वाच्या ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून, १ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सिग्नल-फ्री होणार असल्याने अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.



उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आज प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन मिसिंग लिंक प्रकल्पाची पाहणी केली. “मी स्वतः येथे येऊन कामाची गुणवत्ता तपासली असून काम समाधानकारक झाले आहे. उर्वरित किरकोळ कामे पुढील काही दिवसांत पूर्ण होतील. वेळेत आणि उच्च दर्जाने काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत,” असे त्यांनी सांगितले.

सुमारे १०.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात दोन भव्य बोगदे, उंच व्हायाडक्ट आणि टायगर व्हॅलीवरील सुमारे १८२ मीटर उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. सुमारे २३.७५ मीटर रुंद बोगदा हा जगातील सर्वात रुंद बोगद्यांपैकी एक मानला जातो. ७० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे, मुसळधार पाऊस आणि कठीण भौगोलिक परिस्थितीत हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. लोणावळा तलावाच्या १८२ मीटर खालून हा रस्ता जाणार आहे, हा प्रकल्प पूर्ण करणे म्हणजे एक आव्हान होते मात्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (MS-RDC) हे मोठे आव्हान स्वीकारून प्रकल्प पूर्णत्वास नेल्याचे शिंदे यांनी नमूद केले.

मिसिंग लिंक सुरू झाल्यानंतर घाटातील धोकादायक वळणे आणि वाहतूक पूर्णपणे बायपास होणार असून प्रवासाचा वेळ सुमारे २० ते ३० मिनिटांनी कमी होईल. “या प्रकल्पामुळे घाटातील अपघात जवळपास शून्यावर येतील,” असा ठाम दावा शिंदे यांनी केला. यामुळे इंधनाची बचत, वेळेची बचत आणि प्रदूषणात लक्षणीय घट होणार आहे.

या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी होणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात बस आणि हलक्या वाहनांना प्राधान्य देण्यात येणार असून त्यामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल.

टोलवाढीबाबत स्पष्ट करताना शिंदे म्हणाले की, “मिसिंग लिंक प्रकल्पामुळे टोलमध्ये कोणतीही वाढ होणार नाही. खालापूर टोल नाक्यावरही सध्या कोणतीही वाढ प्रस्तावित नाही.”

सुमारे ६७०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला २०१९ साली मंजुरी देण्यात आली होती. त्या वेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते, तर आता त्यांच्या उपस्थितीतच या प्रकल्पाचे लोकार्पण होणार असल्याने हा एक विशेष योगायोग असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हा देशातील पहिला ॲक्सेस कंट्रोल मार्ग ठरला होता. या मार्गामुळे आयटी, सेवा क्षेत्र, उद्योग आणि रिअल इस्टेटमध्ये मोठी वाढ झाली.



आता मिसिंग लिंक प्रकल्पामुळे या मार्गाची कार्यक्षमता आणखी वाढणार आहे.

तसेच या प्रकल्पामुळे लोहगड, विसापूर किल्ले आणि कार्ला लेणी यांसारख्या पर्यटन स्थळांना अधिक चांगली कनेक्टिव्हिटी मिळणार असून पर्यटनालाही चालना मिळेल. यासाठीच या प्रकल्पातील बोगद्यांना देखील गडकिल्ले आणि कार्ला लेण्याच्या प्रतीकृतीप्रमाणे सजवण्यात आले असल्याचे शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले. कामाचा दर्जा उत्तम ठेवून ही शिल्प खराब होऊ नयेत याची पुरेशी खबरदारी घेण्यात आली असल्याचे यावेळी शिंदे यांनी स्पष्ट केले

“अशा प्रकारचे प्रकल्प हे केवळ रस्ते नसून राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती देणारे असतात. कनेक्टिव्हिटी मजबूत असेल तर उद्योग, आयटी, सेवा क्षेत्र आणि रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढतात,” असे शिंदे यांनी सांगितले.

पुढील काळात समृद्धी महामार्ग, कोकण कोस्टल रोड, वसई-विरार मल्टीमोडल कॉरिडॉर यांसारख्या प्रकल्पांना जोडून राज्यात ॲक्सेस कंट्रोल रस्त्यांचे जाळे उभारण्यावर सरकारचा भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. “महाराष्ट्रातील कोणत्याही कोपऱ्यातून दुसऱ्या कोपऱ्यात ७ ते ८ तासांत पोहोचता येईल, अशी सक्षम दळणवळण व्यवस्था उभारत आहोत,” असे त्यांनी सांगितले.

मिसिंग लिंक प्रकल्पामुळे मुंबई आणि पुणे यांच्यातील प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सुलभ होणार असून हा प्रकल्प राज्याच्या विकासाला गती देणारा ठरणार असल्याचा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, माजी नगरसेवक आबासाहेब बागुल, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड आणि एमएसआरडीसी, एफ्कॉन आणि नवयुग कंपनीचे सर्व प्रमुख अभियंते आणि कर्मचारी उपस्थित होते.




## मनोहर रोहिदास राठोड यांची राष्ट्रीय बंजारा महासंघाच्या कोकण प्रदेश संघटकपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** बंजारा समाजाच्या संवैधानिक हक्कांसाठी कार्यरत असलेल्या राष्ट्रीय बंजारा महासंघाच्या वतीने कोकण प्रदेशात संघटनात्मक विस्ताराला वेग देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मनोहर रोहिदास राठोड यांची संघटक पदावर सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली असून, याबाबतचे अधिकृत नियुक्तीपत्र दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी जारी करण्यात आले.

राष्ट्रीय अध्यक्ष श्री. भिकन रामदास जाधव, संस्थापक प्रदेशाध्यक्ष प्रा. पी. टी. चव्हाण, प्रदेश कार्याध्यक्ष श्री. मधुकर आनंदा जाठोत तसेच प्रदेश सरचिटणीस श्री. अमोलभाऊ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली आहे.

मनोहर राठोड यांनी सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांची या महत्त्वाच्या पदावर निवड करण्यात आली असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले. संघटक म्हणून काम करताना त्यांनी संवैधानिक मार्गाने व कायद्याच्या चौकटीत राहून बंजारा समाजाच्या न्याय हक्कांसाठी सातत्याने प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

तसेच, संघटनेला अधिक गतिमान व बळकट करण्यासाठी प्रयत्नशील राहून बंजारा समाजाचे प्रश्न राष्ट्रीय व राज्य स्तरावर प्रभावीपणे मांडावेत, असेही निर्देश नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहेत. त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी महासंघाच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, संघटनात्मक कार्याचा मासिक अहवाल प्रदेशाध्यक्ष व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना लेखी स्वरूपात सादर करण्याचेही निर्देश देण्यात आले असून ही नियुक्ती तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे.

## नवीन पनवेल आदई सर्कलजवळ राजीव गांधी मैदान परिसरात पदपथ अडथळा

### वाहतूक कोंडी व प्रशासनाची निष्क्रियता

**दैनिक युवक आधार**

**दिपक कोळवणकर पनवेल प्रतिनिधी :** नवीन पनवेल येथील आदई सर्कलजवळ राजीव गांधी मैदान परिसरात नागरिकांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. या ठिकाणी असलेला फूटपाथ पूर्णपणे लोखंडी जाळी लावून बंद करण्यात आला असून, पदचाऱ्यांना चालण्यासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था उपलब्ध नाही. परिणामी, नागरिकांना जीव मुठीत धरून थेट रस्त्यावरून चालावे लागत आहे.

या भागात आधीच मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. त्यातच जाळीलगत चार ठिकाणी बेकायदेशीर पार्किंगमुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. यामुळे अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत असून, प्रशासन मात्र



याकडे दुर्लक्ष करत आहे.

तसेच, पालिका प्रशासनाकडून सुरू असलेले गटाराचे काम गेल्या अनेक दिवसांपासून रखडलेले आहे. अपूर्ण काम, उघडी पडलेली जागा आणि अडथळे यामुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. हा प्रश्न केवळ गैरसोयीचा नसून, थेट नागरिकांच्या जीविताशी संबंधित आहे.

प्रशासनाला प्रश्न विचारावासा वाटतो की, एखादा मोठा अपघात घडल्यावरच जाग येणार आहे का? नागरिकांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करून नेमके कोणाचे हित साधले जात आहे?

**तरी संबंधित पालिका प्रशासनाने तात्काळ पुढील उपाययोजना कराव्यात:**

- फूटपाथ त्वरित मोकळा करून पदचाऱ्यांसाठी खुला करावा
- बेकायदेशीर पार्किंगवर कडक कारवाई करावी
- रखडलेले गटाराचे काम तातडीने पूर्ण करावे
- परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात
- अन्यथा, नागरिकांच्या रोषाला सामोरे जाण्याची जबाबदारी पूर्णतः प्रशासनाची राहील.

# निफाड तहसीलचा अभिमान! महाराष्ट्र दिनी उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**
**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिन गुरुवार, दि. १ मे २०२६ रोजी निफाड तहसील कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने वर्षभरात उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आल्याची माहिती तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी दिली.

तहसील कार्यालयाच्या विविध विभागांमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांपैकी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांची तालुकास्तरावर निवड करण्यात आली आहे. या सन्मान सोहळ्यास आमदार दिलीपकाका बनकर व उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

सन्मानार्थींमध्ये पुरवठा निरीक्षण अधिकारी अतुल गायकवाड, सहायक महसूल अधिकारी मारुती ठाकरे, तसेच महाराजस्व अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणारे चांदोरी, सायखेडा, रानवड, पालखेड, नांदूरमधमेश्वर, देवगाव, विंचूर व लासलगाव येथील मंडळ अधिकारी यांचा समावेश आहे.याशिवाय ग्रामअधिकारी गोरक्षनाथ दाते (मुखेड), ईश्वरी देशमुख (पिंपळगाव परिसर), महसूल सहाय्यक (फौजदारी) ललित खैरे, बूथस्तरीय अधिकारी गोकुळ शेलार (सोनगाव) व बाळकृष्ण शिंदे (शिंगवे), प्राथमिक शिक्षक मुकेश सोनवणे व प्रमोद चव्हाण, पोलीस पाटील भाग्यश्री बोरसे (शिवडी), शिपाई दामोदर पगारे, महसूल सेवक सौ. ताई अहिरे (पिंपळगाव बसवंत), पीकपाणी सहाय्यक राजेश चव्हाण (गोंडेगाव) व ऋषिकेश चकोर (खानगाव थडी), संगणक ऑपरेटर सौ. सारिका कोल्हे, जनगणना कक्षाचे रवींद्र पडोळ, पुरवठा शाखेच्या सौ. सविता काळे, निवडणूक शाखेचे संदीप खालकर तसेच 'आपले सरकार सेवा केंद्र'चे राहुल बरकले (कसबे सुकेणे) यांचा गौरव करण्यात येणार आहे.

**तालुक्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निष्ठा, सचोटी व लोकाभिमुख सेवेला सलाम म्हणून हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सन्मानार्थींच्या कार्यामुळे प्रशासनाची प्रतिमा उंचावली असून, त्यांचा गौरव इतरांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे**
**तहसीलदार :-विशाल नाईकवाडे**

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचे राजकारण केव्हा संपणार?

**दैनिक युवक आधार,**
**ता कर्जत / वैभव गायकवाड** : छत्रपती शिवाजी महाराज हे फक्त महाराष्ट्रापुरते नाही तर सबंध भारताचे आराध्य आहेत. त्यांची कीर्ती ही महाराष्ट्राच्या मातीत आणि या मातीत जन्म घेणाऱ्या प्रत्येकाच्या रक्तात रुजलेली आहे. प्रत्येक राजकारणी आपापल्या पद्धतीने महामानावांची नावे घेऊन मतांसाठी राजकारण करत असतात हे जगजाहीर आहे, परंतु ह्या महामानावांचे आदर्श, त्यांचे विचार, त्यांसारखे आचरण कोणीही बाळगत नाही. तसे झाले असते तर आपला देश केव्हाच महासत्ता झाला असता.

असोत, बुलढाण्याचे आमदार जे कायम वादग्रस्त वक्तव्य करणे किंवा वादाच्या भोवऱ्यात सापडणारे संजय गायकवाड आणि कोल्हापूरचे पुस्तक प्रकाशक प्रशांत कांबी यांच्यामध्ये "शिवाजी कोण होता?" या पुस्तकावरून वाद झाल्याचे समोर आले. मुख्यतः हे पुस्तक कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी लिहिलेलं आहे आणि ते पुस्तक ११ एप्रिल १९८८ रोजी प्रकाशित झाले होते. आजही हे पुस्तक शिवाजी महाराजांविषयी अभ्यास करणारे व शिवाजी महाराजांच्या इतिहासात रस असणाऱ्या प्रत्येकास प्रेरणा देणारे पुस्तक आहे.

हा संपूर्ण वाद पुस्तकाच्या शीर्षकासंदर्भात असल्याचे समजते, जेथे आमदार संजय गायकवाड प्रकाशकाला अतिशय खाल्याच्या पातळीला जाऊन दूरध्वनीच्या माध्यमातून गलिच्छ शिव्या देतानाची एक फीत समाजमाध्यमावर प्रसारित झाली. प्रकाशक प्रशांत कांबी हे आमदार संजय गायकवाड यांना वारंवार सांगत होते हे पुस्तक त्यांनी प्रकाशित केले आहे, ते स्वतः लेखक नाहीत. तसेच त्यांनी एकदा पुस्तक वाचावं आणि नंतर पुस्तकाबद्दल व्यक्त व्हावं. परंतु आमदार ऐकतील तर काय? ते आमदार आहेत, त्यांना पुस्तक वाचायची आवशकता नाही. शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केलाच कसा? म्हणून पेटून उठलेले आमदार मात्र सिंधुदुर्ग येथे कोसळलेला महारांचा पुतळा त्यावर इतके संतापलेले दिसले नाहीत. धिरेंद्र शास्त्री नावाचा बाबा शिवाजी महाराजांबद्दल खोटी माहिती पसरवतो तेव्हा आमदार साहेब काहीच बोलले नाही. महाराष्ट्राचे माजी राज्यपाल कोश्यारी जेव्हा महाराजांबद्दल अपमानकारक उदगार काढतात तेव्हा आमदार साहेबांना त्यांना जाब विचारणे योग्य वाटले नसावे!

परंतु मराठी मातीमधल्या एका साधारण प्रकाशकाने पुस्तक प्रकाशित केले म्हणून त्याला व त्याच्या कुटुंबियांना अतिशत खालच्या पातळीची शिवीगाळ करणे कितपत योग्य आहे? ते सुद्धा एका जबाबदार लोकनिर्वाचित व संविधानिक पद्धतीने निवडून पदावर बसलेल्या आमदाराने? यामुळे, सर्वच सामाजिक स्तरावर व समाजामाध्यामावर आमदार संजय गायकवाड यांच्यावर एकच टिकेची झोळ उठली आहे. ज्यांनी हे पुस्तक वाचले आहे ते कधीच असा प्रश्न विचारू शकत नाही, अशा भावना व्यक्त होत आहेत.

केवळ महाराजांचं नाव एकेरी का आहे? पण त्यातला गाभा समजून न घेता एखाद्याला मारण्याच्या धमक्या देणं? त्याच्या परिवारातील स्त्री सदस्यांना गलिच्छ भाषेत शिवीगाळ करणं? आणि महारांच्या नावावर राजकीय पोळी भाजणं कितपत योग्य आहे? ही विचार करण्याची गोष्ट आहे.इथे एक वाक्य नक्की नमूद करावेसे वाटते ते म्हणजे, "वाचाल, तर वाचाल".

# धर्माबाद पोलिसांची धडक कारवाई! ५० किलो गोमांसासह दुचाकी जप्त, एकास अटक

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी /गिरमाजी सूर्यकार** : शहरातील अवैध गोमांस विक्री व वाहतूक रोखण्यासाठी धर्माबाद पोलिसांनी गांधीनगर परिसरात गुरुवारी सकाळी जोरदार छापा टाकत एका आरोपीला अटक केली. या कारवाईत सुमारे ५० किलो गोमांससह दुचाकी जप्त करण्यात आली असून, एकूण ४२,५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, २३ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ९.०५ वाजता गांधीनगर येथील उर्दू शाळेजवळ गस्त घालत असताना पोलिसांना संशयास्पद हालचाल दिसून आली. तत्काळ तपासणी केली असता मोहम्मद फैजान उस्मान कुरेशी (वय २७, रा. गांधीनगर, धर्माबाद) याच्या ताब्यातील पांढऱ्या पोत्यामध्ये अंदाजे ५० किलो गोमांस आढळून आले.




या कारवाईदरम्यान सुमारे १२,५०० रुपये किमतीचे गोमांस आणि ३०,००० रुपये किमतीची हिरो होंडा स्प्लेंडर प्लस (क्रमांक MH-25-AE-8260) ही दुचाकी जप्त करण्यात आली. आरोपीस ताब्यात घेऊन न्यायालयात हजर करण्यात आले आहे.

या प्रकरणी धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९७/२०२६ नोंद करण्यात आला असून, भारतीय न्याय संहिता कलम ३२५ तसेच महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ मधील कलम ५ (ब) व ५ (ड) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस कॉन्स्टेबल अरुण सुभाष कदम यांच्या माहितीनुसार करण्यात आली. पुढील तपास पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस उपनिरीक्षक मठपती करीत आहेत. या प्रकरणात इतर साथीदारांचा सहभाग असण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी त्यांचा शोध सुरू केला आहे.

दरम्यान, अवैध गोमांस विक्री, साठवणूक किंवा वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा धर्माबाद पोलीस ठाण्याने दिला आहे. या धडक कारवाईमुळे शहरात अवैध गोमास विक्री करणाऱ्यावर पोलिसांचा वचक निर्माण झाला असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

# साखरे बोरगांव ची भूमी कन्या हर्षदा चव्हाण चे "एमपीएससी" परीक्षेत यश

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** : बीड तालुक्यातील बालाघाटावरील मौजे साखरे बोरगांव ची भूमी कन्या व राज्य सहकारी बँकेचे श्री. विष्णु चव्हाण यांनी कन्या ईजि.हर्षदा विष्णू चव्हाण यांनी खरगपूर येथून आय आय टी पदवी पूर्ण केली. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत [MPSC] मार्फत नगर विकास विभागात सहाय्यक नगर रचनाकार [Town planner] पदाच्या परीक्षेत महाराष्ट्रात ७ वा रँक मिळवून महाराष्ट्रातुन मुलीमधुन दुसरी येण्याचा मान मिळवला आहे. घवघवीत यश मिळविल्या बद्दल कु.हर्षदा चव्हाण हिचा बीड



येथे सत्कार करण्यात आला. कु.हर्षदा चव्हाण यांचा भाऊ चि.विक्रांत चव्हाण हे पण एमपीएससी परीक्षेतुन बांधकाम विभागात बार्शी येथे कार्यकारी अभियंता पदावर कार्यरत आहेत. कु.हर्षादा चव्हाण व तिच्या आई वडिलांचे बंकटस्वामी संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे, ह.भ.प.नाना महाराज कदम, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख श्री.अनिलदादा जगताप माजी नगरसेवक श्री. अरुण चौरे, शिवसंग्रामचे श्री.सुहास पाटील, बालरोग तज्ञ डॉ.प्रदिप शेळके, साखरे बोरगांवचे माजी अग्नीशमन अधिकारी शिवाजीराव झनझन, माजी दारूबंदी अधिकारी राम नाईकवाडे, कैलास कुटे, दत्ता घरत, सरपंच गजानन घरत, पोलीस पाटील तुकाराम घरत, चेअरमन राजेंद्र नाना घरत, माजी सरपंच बाबासाहेब देवगुडे, सखाराम जाधव, विश्वाबंर जाधव वसंत जगदाळे, विश्वाबंर जगदाळे, राजेंद्र घोडके, अशोक गाढवे, प्रा.कृष्णा झनझन, प्रा. डॉ.अशोक देवगुडे व समस्त गावकऱ्यांच्या वतीने अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. लवकरच बालाघाटावर तिचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. कु.हर्षादा चव्हाण यांनी मिळवलेल्या यशामुळे त्यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

# मावेली पब्लिकेशन्सतर्फे मुंबईत 'आंबेडकरवादी स्त्रियांच्या कवितेची एक सायंकालीन कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :** मावेली पब्लिकेशन्सला आपल्या पहिल्या पुस्तकाच्या प्रकाशनाची घोषणा करताना अत्यंत अभिमान आणि आनंद वाटत आहे. 'Leaping Towards the Deep Blue Sky' (निळ्या अथांग आकाशाकडे झेप घेताना) या पुस्तकाचे प्रकाशन एका महत्त्वपूर्ण साहित्यिक कार्यक्रमाद्वारे होणार आहे: 'Transforming Life Into A Song: An Evening of Ambed-karite Women's Poetry' (जीवनाचे गाण्यात रूपांतर: आंबेडकरवादी स्त्रियांच्या कवितेचा एक सायंकालीन कार्यक्रम). हा कार्यक्रम गुरुवार, ३० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६:०० ते ९:०० या वेळेत, मुंबई येथील दादर-माटुंगा कल्चरल सेंटरमध्ये पार पडेल. या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून तो सर्वांसाठी खुला आहे.

या नवीन काव्यसंग्रहामध्ये महाराष्ट्रातील आंबेडकरवादी कवयित्रींच्या तीन पिढ्यांच्या साहित्याचा समावेश करण्यात आला असून, या कवितांचे मूळ मराठीतून इंग्रजीमध्ये भाषांतर करण्यात आले आहे. हा संग्रह सुरुवातीच्या काळातील दलित स्त्रीवादी लेखनापासून ते समकालीन 'क्विअर' (Queer) आणि राजकीय अभिव्यक्तींपर्यंतचा एक सशक्त प्रवास मांडतो. वाचकांना दलित स्त्रीत्वाच्या प्रत्यक्ष अनुभवांची आणि भावविश्वाची एक सखोल व जवळून ओळख करून देण्याचे कार्य हा संग्रहात व्यक्त झाले आहे.

# सहकार क्षेत्रात जिल्ह्यात भाजपला मोठा धक्का; कृषी उत्पन्न बाजार समितीतील सर्व १७ संचालक अपात्र

**दैनिक युवक आधार**
**अंजनगाव सुर्जी संतोषराव घोडेराव, तालुका प्रतिनिधी** : अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC) संचालक मंडळावर मोठी कारवाई करण्यात आली असून सर्व १७ संचालकांना अपात्र घोषित करण्यात आले आहे. २४ एप्रिल २०२५ रोजी जाहीर झालेल्या आदेशामुळे सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी अपील क्रमांक ७ आणि ८ / 2025 च्या निकालानंतर हा निर्णय दिला. या कारवाईत बाजार समितीच्या निधीचा नियमबाह्य खर्च, महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील विविध कलमांचे ११, १२(१), १३, २९, ३७(२)(५) चे तसेच अर्थसंकल्प मंजुरीतील त्रुटी आणि उपविधींचे (bye- laws) उल्लंघन झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच, महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक नियम २०१७ अंतर्गत नियम १०(२)(i) चे उल्लंघन झाल्यामुळे सर्व संचालकांना अपात्र ठरविण्यात आले आहे. विपणन संचालकालयाने कलम ४०(ड) अंतर्गत दिलेल्या निर्देशांचे पालन न केल्याचाही उल्लेख आदेशात करण्यात आला आहे.ही कारवाई शरद साबळे, सुधीर अढाउ व विनायक वाघ यांनी केलेल्या तक्रारीनंतर करण्यात आली. ज्यामध्ये त्यांनी संचालक मंडळावर आर्थिक अनियमितता, गैरव्यवहार आणि कार्यपद्धतीतील त्रुटींचे आरोप केले होते.

अंजनगाव सुर्जी APMC ही जिल्ह्यातील भाजप समर्थित एकमेव बाजार समिती मानली जात होती. त्यामुळे या निर्णयाला राजकीय दृष्ट्याही मोठा धक्का मानला जात आहे. संचालक मंडळ अपात्र ठरल्यामुळे आता बाजार समितीवर प्रशासक नेमण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

माजी अध्यक्ष जयंत साबळे यांनी या कारवाईमागे राजकीय हस्तक्षेप असल्याचा आरोप केला असून मंडळाने शेतकऱ्यांसाठी कोट्यवधी रुपयांची विकासकामे केल्याचा दावाही यावेळी त्यांनी केला आहे. तसेच या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे अशी माहिती मिळाली.दरम्यान, या घडामोडींनंतर पुढील काही दिवसांत परिस्थिती कोणते वळण घेते, याकडे सहकार क्षेत्रासह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# रायगडला धक्का: साळाव ग्रामपंचायतीचे अहवाल गहाळ! सिस्टीमॅटिक भ्रष्टाचार ?

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : साळाव ग्रामपंचायतीतून शासकीय लेखापरीक्षण दस्तऐवज नष्ट; आर्थिक अनियमिततेचा संशय, ग्रामसेवकांवर फौजदारी गुन्हा दाखल करा! रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील साळाव ग्रामपंचायतीतून भ्रष्टाचाराच्या संशयाने दोन वर्षांचे शासकीय लेखापरीक्षण अहवाल जाणीवपूर्वक गायब केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रमोद शंकर नागोठणेकर यांच्या तक्रारीने हा मुद्दा जिल्हाभरात खळबळ माजवली असून, *ग्रामपंचायतींच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपटले आहे

अभिलेख गायबचा प्रकार

माहिती अधिकाराखाली नागोठणेकर यांनी साळाव ग्रामपंचायतीकडे मागील १५




वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल व ग्रामसभेचे ठराव मागितले होते. मात्र, ग्रामपंचायत कार्यालयाने सन २००४-०५ व २००५-०६ या वर्षांचे अहवाल दप्तरी उपलब्ध नसल्याचे लेखी कळवले. सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय, रायगड यांच्याकडाही या अहवालांची नोंद नसल्याचे उघड झाले. या कालावधीतील ग्रामनिधी व विविध योजनांतील खर्चाचा तपशील या अहवालांत असल्याने आर्थिक अनियमितता व निधी अपहाराची शक्यता नाकारता येत नाही.हे अहवाल सार्वजनिक दस्तऐवज असून, त्यांचे जतन ग्रामसेवक व अधिकाऱ्यांची कायदेशीर जबाबदारी आहे. असे अभिलेख गहाळ होणे हे महाराष्ट्र अभिलेख अधिनियम २००५ च्या कलम ७ व ९ चे उल्लंघन असून, फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे.

*जबाबदार व्यक्तीवर कारवाईची मागणी*

नागोठणेकर यांनी तत्कालीन ग्रामसेवक दिलीप महादेव तुरे व जगन्नाथ चांगू चवरकर, तसेच जनमाहिती अधिकारी वि.सु. फासे यांच्यावर जबाबदारी निश्चित करून रेवदंडा पोलीस ठाण्यात व लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे गुन्हा नोंदवण्याची मागणी केली आहे. तक्रारीत मुंबई उच्च न्यायालयाच्या 'विवेक कुलकर्णी विरुद्ध महाराष्ट्र राज्य' निर्णयाचा उल्लेख करत 'अभिलेख उपलब्ध नाहीत' हे कारण ग्राह्य धरता येत नसल्याचे स्पष्ट केले. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम BNSS १७३(१) अंतर्गतही कारवाईची मागणी.

***प्रशासनाची भूमिका व इशारा***

या प्रकरणात गुन्हा तात्काळ नोंदवला गेला नाही तर पोलीस अधीक्षक व न्यायालयात दाद मागण्याचा इशारा नागोठणेकर यांनी दिला आहे. रायगड जिल्ह्यात अशा प्रकाराने अभिलेख नष्ट करणे ही सिस्टीमॅटिक भ्रष्टाचाराची सुरुवात असल्याचे मत व्यक्त होत आहे. ग्रामविकास विभागाच्या शासन पत्रानुसार अभिलेख सुस्थितीत ठेवणे व परिरक्षण अनिवार्य असून, जिल्ह्यातील इतर ग्रामपंचायतींमध्येही तपास व्हावा.या प्रकरणाने रायगड जिल्ह्यातील नागरिकांमध्ये भ्रष्टाचाराविरुद्ध जागृती निर्माण झाली असून, प्रशासनाने तातडीने कारवाई करावी अशी मागणी वाढत आहे

# खाजगी रुग्णालयाच्या बाथरूममध्ये २९ वर्षीय नर्सची आत्महत्या

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे** : जामखेड शहरातील लोंढे हॉस्पिटलमधील बाथरूममध्ये एका नर्सने आत्महत्या केली.शबनम दस्तगीर सय्यद(वय २९)असे या मृत नर्सचे नाव आहे.याबाबत त्यांचे वडील दस्तगीर सय्यद(वय ५५,रा.पोकळे वस्ती,जामखेड) यांनी दिलेल्या खबरीवरून जामखेड पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली.

जामखेड शहरात एका खाजगी हॉस्पिटल मध्ये शबनम सय्यद नर्स चे काम करत होती. हॉस्पिटलच्या बाथरूम मध्ये आत्महत्या केल्याची घटना घडली आहे बाथरूममध्ये



इंजेक्शनची सुई सापडली आहे आत्महतेचे कारण अद्याप ही समजू शकले नाही.

दस्तगीर सय्यद यांच्या खबरीनुसार, त्यांची मुलगी शबनम दस्तगीर सय्यद ही लोंढे हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून काम करीत होती.गुरुवारी(दि.२३) सकाळी १० वाजता ती नेहमीप्रमाणे कामावर गेली होती.सकाळी साडेदहा वाजता ती बाथरूममध्ये गेली,मात्र बराच वेळ ती बाहेर आली नाही.त्यामुळे स्टाफने दरवाजा तोडून पाहिले असता,ती बेशुद्धावस्थेत आढळून आली. तिला ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.नगरसेवक राजू गोरे यांनी फोनवर सय्यद यांना कळवले. दुपारी अडीच वाजता डॉक्टरांनी शबनम हिचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले. याप्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.नर्स शबनम दस्तगीर ही विवाहित असून,तिला पाच व सहा वर्षांची दोन मुले आहेत.घटस्फोट झाल्याने ती माहेरी वडिलांकडे राहत होती.

# किशोर आण्णासाहेब थोरात यांना युनायटेड अमेरिकन युनिव्हर्सिटी कडून मानद डॉक्टरेट प्रदान

**दैनिक युवक आधार**

**पुणे प्रतिनिधी :** सामाजिक कार्यातील उल्लेखनीय आणि सातत्यपूर्ण योगदानाबद्दल किशोर आण्णासाहेब थोरात यांना युनायटेड अमेरिकन युनिव्हर्सिटी तर्फे मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. हा गौरव सोहळा दिल्ली येथे २५ एप्रिल रोजी सत्य साई भवन येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

किशोर थोरात यांच्या शंभर पानी नामांकन प्रस्तावाने युनिव्हर्सिटीवर विशेष प्रभावी छाप पाडली. त्यांच्या समाजकार्याची सखोल माहिती, प्रत्यक्ष केलेल्या उपक्रमांची मांडणी आणि त्यामागील निस्वार्थ भावना पाहून त्यांना हा सन्मान बहाल करण्यात आला.

हा प्रतिष्ठेचा मान खालील मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला:

श्री राजा मनवेंद्र सिंग(माजी केंद्रीय राज्यमंत्री, भारत सरकार व माजी खासदार, मथुरा, राष्ट्रीय अध्यक्ष – अखिल भारतीय क्षत्रिय महासभा) आणि

डॉ.के वेंकटसन(संस्थापक व संचालक, युनायटेड अमेरिकन युनिव्हर्सिटी, माजी न्यायाधीश – तामिळनाडू न्यायव्यवस्था).

**किशोर थोरात यांचे सामाजिक कार्य**

किशोर थोरात हे गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील वंचित, गरजू आणि निराधार घटकांसाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांचे कार्य विविध स्तरांवर पसरलेले आहे:

गरजू नागरिकांसाठी अन्नदान व जीवनावश्यक मदत

गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व मार्गदर्शन

मतिमंद मुलांना साहाय्य करणे

रक्तदान शिबिरे आणि आरोग्य जनजागृती उपक्रम

युवकांना करिअर मार्गदर्शन व नैतिक मूल्यांची शिकवण

स्वच्छता, आरोग्य आणि सामाजिक ऐक्य ,पर्यावरण यासाठी विविध अभियान

मानवाधिकार जनजागृती करणे

त्यांच्या कार्याची खासियत म्हणजे— प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष कामावर भर. “समाजासाठी काहीतरी करायचे” या एका ध्येयाने त्यांनी अनेकांचे आयुष्य बदलण्याचा प्रयत्न केला आहे.




यापूर्वी मिळालेले पुरस्कार व सन्मान

किशोर थोरात यांना त्यांच्या सामाजिक कार्यासाठी विविध स्तरांवर सन्मानित करण्यात आले आहे. त्यामध्ये प्रमुखतः:

आदर्श समाजरत्न पुरस्कार

छत्रपती महाराष्ट्र गौरव सन्मान

आयकॉन ऑफ आशिया पुरस्कार

विविध संस्थांकडून गौरवपत्र व सत्कार

हे सर्व सन्मान त्यांच्या कार्याची साक्ष देतात आणि त्यांना अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा देतात.

**शून्यातून उभे राहिलेले व्यक्तिमत्त्व**

किशोर थोरात यांचा प्रवास हा अत्यंत प्रेरणादायी आहे. साध्या कुटुंबातून आलेले हे व्यक्तिमत्त्व आज समाजात एक वेगळी ओळख निर्माण करत आहे. कोणत्याही मोठ्या साधनसामग्रीशिवाय, केवळ जिद्द, मेहनत आणि समाजसेवेची प्रामाणिक भावना यांच्या जोरावर त्यांनी स्वतःचे स्थान निर्माण केले आहे.

त्यांच्या जीवनाचा संदेश स्पष्ट आहे—

“परिस्थिती काहीही असो, इच्छाशक्ती आणि प्रामाणिक प्रयत्न असतील तर यश मिळवणे शक्य आहे.”

किशोर थोरात हे मूळचे उक्कलगाव तालुका श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर येथील असून सध्या पिंपरी चिंचवड येथिल रहिवासी आहेत.

हा मानद डॉक्टरेट सन्मान मिळाल्याबद्दल किशोर थोरात यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत:

युनायटेड अमेरिकन युनिव्हर्सिटी चे विशेष आभार, ज्यांनी त्यांच्या कार्याची दखल घेतली

सामाजिक कार्यातील सहकारी, मित्र आणि सर्व समर्थक यांचे मनापासून आभार

कुटुंबियांचे विशेष आभार, ज्यांनी प्रत्येक टप्प्यावर साथ दिली

त्यांनी हा सन्मान समाजातील सर्व गरजू, वंचित आणि निराधार बांधवांना समर्पित केला आहे.

किशोर आण्णासाहेब थोरात यांना मिळालेली ही मानद डॉक्टरेट केवळ वैयक्तिक यश नसून, संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यातून एक संदेश मिळतो—

“खरी सेवा हीच खरी ओळख असते.”

हा सन्मान त्यांच्या पुढील समाजकार्याला नवी दिशा आणि ऊर्जा देणारा ठरेल, यात शंका नाही.

किशोर थोरात हे महाराष्ट्रातील पहिले व्यक्ती आहेत ज्यांना युनायटेड अमेरिकन युनिव्हर्सिटी कडून मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आलेली आहे

तर परिसरातून त्यांचे भरभरून कौतुक केले जात आहे.

## सिद्धार्थ विद्यालयात उन्हाळी शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले लाखनी भंडारा सावरी/मुरमाडी :** सिद्धार्थ विद्यालय तथा कनिष्ठ कला/विज्ञान महाविद्यालय, सावरी/मुरमाडी येथे दिनांक २७ एप्रिल २०२६ ते ०४ मे २०२६ या कालावधीत उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक तसेच व्यक्तिमत्त्व विकासावर आधारित कार्यक्रमांचा समावेश आहे.

शिबिरामध्ये प्रवेशित तसेच प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन विविध कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्या कु. स्वाती वासनिक मॅडम तसेच विद्यालयातील सर्व सहयोगी शिक्षकांनी केले आहे.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि नेतृत्वगुणांचा विकास होण्यास मदत होणार असून, उन्हाळ्याच्या सुट्टीचा सकारात्मक उपयोग करण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे.

## सणसर येथील श्री.भैरवनाथ यात्रा उत्साहात साजरी; नृत्यगणा मानसी पुणेकरचा कार्यक्रम टॉपला

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय :** नुकतीच सणसर ता.इंदापूर गावातील श्री भैरवनाथ माता जोगेश्वरी यात्रा पार पडली.भैरवनाथ यात्रेच्या निमित्ताने आणि यात्रा कमिटीच्या वतीने पारंपरिक पद्धतीने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी देवाचे लग्न,छबीना,तमाशा, दारूगोळा, कुस्त्या,एकापेक्षा एक अप्सरा ऑर्केस्ट्रा,खुशी शिंदे सरकार DJ शो तसेच मानसी पुणेकर DJ शो असे कार्यक्रम घेण्यात आले.

नृत्यगणा मानसी पुणेकर हिच्या कार्यक्रमाला पुरुषांसह महिलांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला कार्यक्रम संपल्यानंतरही महिलांनी जागेवरून हलण्यास नकार देत अजून एक गाण्याची विनंती केली. या आग्रहामुळे मानसी पुणेकर यांनी आणखी गाणी सादर केली आणि अख्खे मैदान उत्साहाने दुमदुमले.

सणसर गावातील तरुण मंडळींनी मानसी पुणेकर यांच्या तालावर ठेका धरला. महिलांचा उत्साह आणि तरुणाईचा सहभाग यामुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला. यात्रेतील हा DJ शो विशेष आकर्षण ठरला असून मानसी पुणेकर यांचा



कार्यक्रम यात्रेत टॉपला ठरला असल्याची प्रतिक्रिया गावातील महिलांनी व युवकांनी सांगितली. यात्रा पार पाडण्यासाठी छत्रपती कारखाना संचालक शिवाजीराव निंबाळकर रामचंद्र निंबाळकर विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विक्रमसिंह निंबाळकर युवा उदयोजक अक्षयभैय्या निंबाळकर सुमित पाटील खजिनदार सचिन शिंदे मिथुन बारवकर सुशील निंबाळकर सुधीर निंबाळकर तुषार निंबाळकर हरिभाऊ निंबाळकर औदुंबर पाटील सुनील निंबाळकर अजित यादव सुनिल कुंभार राहुल जगताप भालचंद्र काटकर रोहित पाटील प्रकाश निंबाळकर दत्तात्रय काळे विक्रम वाघ प्रविण शिंदे पिंटू गुप्ते विशाल पाटील किरण गायकवाड अभिजित गायकवाड रणजित भगत पै अशोक निंबाळकर अजिंक्य निंबाळकर इकबाल काझी आदी युवकांनी यात्रा पार पाडण्यासाठी कौतुकास्पद कामगिरी करून यात्रा पार पाडल्याबद्दल ग्रामस्थांच्या बोलण्यातून त्यांचे विशेष आभार व्यक्त केले.

## पंचायतराज दिनानिमीत्त येरगीत बाल सभा आयोजित

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पे :** पंचायत राज दिनानिमित्त काल शुक्रवारी तालुक्यातील चालुक्यकालीन ऐतिहासिक नगरी येरगी येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बाल सभेचे आयोजन करण्यात आले.येरगी ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने पंचायत राज दिनानिमित्त बालकांच्या विविध समस्या जाणून घेण्याकरता मुले व मुली यांच्याकडून समस्यांचे अर्ज घेण्यात आले.सदर बालक सभेमध्ये बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा घेण्यात आली तसेच सभेला येरगीचे सरपंच, ग्रामसेवक,बालिका पंचायत राज उपसरपंच,यांनी बालस्नेही ग्रामपंचायत व बाल हक्काबाबत मार्गदर्शन केले. यावेळी संतोष पाटील,राजेश तोटावाड,ग्रामसेवक पोदार,प्रभारी मुख्याध्यापक सौ. वैशाली सागावे,तंटामुक्त अध्यक्ष सायलू कांबळे, ग्रामपंचायत सदस्य विश्वनाथ बागेवार,अशोक बरसमवार,सुरेश सोमावार,शालेय शिक्षण समिती अध्यक्ष गजानन भोकसखेडे,बालिका पंचायत राज उपसरपंच पुनम सुर्यवंशी, पोलिस पाटील मोनिका माळगे,महादेवी कुंचगे,रितीका चिटकुलवार,अंगणवाडी सेविका गंगामणी दारलावार,शितल मठपती,हाणमाबाई बरसमवार,मंजुळा सिलमकुटवार,ग्रामपंचायत कर्मचारी संगणक चालक माधव ईज्जरवार,मल्लिकार्जुन मठपती आदी गावकरी मोठ्या संख्येने या सभेस उपस्थित होते.सदरील बाल सभेमध्ये बाल स्नेही सरपंच व इतर पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.ती पुढील प्रमाणे आहे.

यात बालस्नेही पंचायत सरपंच म्हणून महादेवी वाघमारे, उपसरपंच सोमनाथ बरसमवार, ग्रामसेवक महेश्वरी दाणेवार,तंटामुक्त अध्यक्ष श्रध्दा कुडते, पोलिस पाटील राजेश्वर चेंडके,शालेय शिक्षण समिती अध्यक्ष बालस्नेही पंचायत सदस्य आर्यध्या बरसमवार,साक्षी बरसमवार,श्रावणी बागेवार, ग्रामपंचायत कर्मचारी म्हणून संगीता तोटावार यांची निवड करण्यात आली.या निवडीमुळे संपूर्ण गावात बाल स्नेही गाव या संदर्भात सकारात्मक चर्चा होत असल्याचे दिसून आले.

## आदिवासी डोंगराळ भागात तोरणं फळ

**झाडा झुडपाच्या आड**
**लवंडली ती तोरणं**
**सारा वैशाख पिऊन**
**वाट ज्येष्ठाची पाहून**

**ढोर सांभाळी गुराखी**
**अर्ध्या उपाशी पोटानं**
**त्याची भागविते भूक**
**राना वनांची तोरणं**

समकालीन आदिवासी निसर्ग कवी काळूदास कनोजे यांच्या कवितेतील ओळी जंगलातील तोरण फळांचे दर्शनच घडवतात.आदिवासी डोंगराळ भागात आजही जंगल क्षेत्र जास्त प्रमाणात असल्यामुळे वेगवेगळ्या वनस्पतींचे साम्राज्य पाहायला मिळते. शिशिरात होणारी पानगळ थांबल्यानंतर डोंगराळ भागात उष्ण वातावरणात



अनेक रानटी फळझाड फळांनी बहरायला सुरुवात होते. वसंत ऋतूच्या आगमनात निसर्गाच्या सानिध्यातील प्रसन्न वातावरणात तोरण हे जंगली वेलवर्गीय काटेरी फळझाड पांढऱ्या रंगाच्या लहान,लहान फळांनी बहरून गेलेली आहेत. ह्या वर्षी अवकाळी पाऊस उशिरापर्यंत झाल्यामुळे फळझाड पांढऱ्या रंगाच्या रान फळांनी लवून आलेली दिसतात. तोरणीची फळ अगदी शेंगदाण्याच्या आकारासारखे लहान असतात परंतु चवीला आंबट,गोड लागतात. आदिवासी भागात तोरणीच्या बिया भाजून खातात. ‘तोरण’ हे वेलवर्गीय काटेरी फळझाड जंगलात अडचणीच्या ठिकाणी अळव,धामोडा,सादडा,असंद अशा दणकट झाडावर तोरणीच्या फांद्या पांगलेल्या असतात. तर कुठे स्वतंत्र वाढून फळांनी खाली वाकलेल्या असतात. अशावेळी जंगलातील खार,तीतर, लावर,कोकतर अशा वेगवेगळ्या प्रजातींचे पक्षी फळे खाण्यासाठी झाडाच्या खालीवर गिरकी घेतात. शेत शिवारात काम करणारे शेतकरी हे तोरण फळं आवडीने खातात. रानात ढोरं चारायला जाणारे गुराखी (बाळदी) हे तोरणावर भूक भागवतात, खेड्यातील लहान लहान पोरं तोरण फळासाठी रानात हिंडतात. आदिवासी भागातील महिला आर्थिक उदरनिर्वाहासाठी तोरण फळांची विक्री बाजारात वाटे करून योग्य भावात विकतात व त्यामुळे आर्थिक टंचाई दूर होते .

**संकलन : श्री. सुभाष कामडी**
**( आदिवासी साहित्य अभ्यासक)**

## देवणी तहसीलदार सोमनाथ वाडकर यांचा कारभार संशयाच्या भोवऱ्यात; बडतर्फीची टांगती तलवार

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम :** देवणी तहसील कार्यालय परिसरातील गोदामाजवळील शासकीय जागेवरून विनापरवाना माती वाहतूक प्रकरण उघडकीस आल्यानंतर तहसीलदार सोमनाथ वाडकर यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकरणात एक विना नंबर तसेच विनापरवाना पोकलेन जेसीबी व दोन हायवा टिप्परद्वारे अंदाजे प्रत्येकी पाच ब्रास शासकीय माती अनधिकृतपणे वाहतूक केली जात असल्याचे महसूल पथकाच्या तपासणीत समोर आले. वाहन चालकांकडे आढळलेल्या पावत्या व आदेश हे संशयास्पद असल्याचे दिसून आले आहे.चौकशीदरम्यान संबंधितांकडून पावती पुस्तक नमुना क्रमांक 28 मधील कोऱ्या पावत्या तसेच तहसीलदारांच्या नावाने आदेश क्रमांक 506, दिनांक 11 एप्रिल 2026 दाखवण्यात आले. मात्र, या कागदपत्रांच्या सत्यतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पंचनाम्यातही विविध पावती



क्रमांक नमूद करण्यात आले आहेत. याप्रकरणी दोन्ही टिप्पर देवणी पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले असून पोकलेन जेसीबी महसूल विभागाच्या ताब्यात देण्यात आली आहे.

दरम्यान, महाराष्ट्र महसूल अधिनियम 1996 चे पोट कलम 48. 7.8.(1)(2 ) तरतुदीनुसार तसेच शासनाच्या गौण खनिज परिपत्रकानुसार संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून निलंगा विभागाचे डेप्युटी कलेक्टर शरद झाडके यांनी ₹11,62,012 ( अकरा लाख 62 हजार बारा रुपये) इतका दंड वसूल करण्याचे आदेश दिले आहेत.

मात्र, या संपूर्ण प्रकरणात तहसीलदार यांच्या आदेशांचा संदर्भ आढळून आल्याने त्यांच्या कारभाराबाबत संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे “तहसीलदार सोमनाथ वाडकर यांचे कारभार संशयाच्या भोवऱ्यात; सापडले असून यांच्याविरुद्ध चौकशी करून शासकीय माती तस्करी( विक्री) संदर्भात कारवाई करतील का?” वरिष्ठ पाठराखण करतील ,तहसीलदार यांच्या आशीर्वादा मुळेच सर्व शक्य असून , या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर कठोर शासन होण्याची मागणी जोर धरत असून तहसीलदार देवणी येथे रुजू झाल्यापासून नागरिकांचे तक्रारी खूप असून लोकसेवक म्हणून त्यांची कारकीर्द कर्तव्य शून्य आहे

## भव्य भीम जयंती महोत्सव उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष पुरस्कृत त्रिपुरा फाउंडेशनच्या वतीने आयोजित १३५ वी भीम जयंती महोत्सव जोगेश्वरी येथे मोठ्या उत्साहात पार पडली. माजी मंत्री व ज्येष्ठ नेते जयंतरावजी पाटील, जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक अजितदादा रावराणे, माजी नगरसेविका रूपालीताई रावराणे, त्रिपुरा फाउंडेशनच्या अध्यक्षा करिश्माताई सुरती, तसेच विकासक राजेश सुरती आदी मान्यवर उपस्थित होते.शिवनाथ खलसे, भगवान ढालवाले, प्रशांत नेब, उल्हास कसबे, सचिन म्हात्रे, सुरेखा लोंढे, स्वप्नील पाटील, रोहित कांबळे, सुरज मिश्रा, राजेश सकट, विजय कसबे, निलेश लोंढे, रोहित लोंढे, दिनेश राखपसरे आदी उपस्थित होते. या जयंतीचे आयोजन व संकल्पना सचिनभाऊ लोंढे जिल्हा अध्यक्ष युवक आणि निलेश लोंढे वॉर्ड अध्यक्ष युवक यांनी केले. “माता रमाई जीवन संग्राम पुरस्कार २०२६” प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार अमरजी कसबे, सुरेशजी सकट, राजू बोरसे, माणिकराव कसबे, उत्तम सकट, गणेश लोंढे, रमेश कसबे, दीपक लोंढे, किसन कसबे, शाम खनपटे, रामू सकट आदींना देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

# अर्धापूरच्या विद्यार्थिनीची जिल्ह्यात बाजी; एनएमएमएस परीक्षेत अस्मिता देशमुख प्रथम

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी अरविंद पांचाळ** : फेब्रुवारी 2025 मध्ये घेण्यात आलेल्या एनएमएमएस परीक्षेत अर्धापूर येथील मीनाक्षी देशमुख मेमोरियल गर्ल्स हायस्कूलची विद्यार्थिनी कु. अस्मिता श्यामसुंदर देशमुख हिने 119 गुण मिळवत नांदेड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे अर्धापूर परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातही प्रचंड प्रतिभा दडलेली असून योग्य मार्गदर्शन



आणि मेहनतीच्या जोरावर विद्यार्थी मोठे यश संपादन करू शकतात, हे अस्मिताने सिद्ध करून दाखवले आहे. शहरांप्रमाणे सुविधा कमी असल्या तरी जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यास यामुळे यश मिळवता येते, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे.मागील वर्षापासून विद्यार्थ्यांकडून नियमित अभ्यास करून घेत श्री आकाश कामारीकर सर यांनी अस्मिताला मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तिने परिश्रमपूर्वक तयारी करत हे यश मिळवले.या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री भास्कर लोखंडे सर यांनी तिचे कौतुक केले असून सर्व शिक्षक वृंदांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# एक लाख सहा हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : एटीएम कार्डद्वारे अकरा वेळा ट्रांजेक्शन करून एक लाख सहा हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात 23 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.70 वर्षीय विजय शंकर महाजन हे कळंबोली, हायवे दर्शन सोसायटी येथे राहत असून ते एटीएममधून पैसे काढण्यासाठी एटीएम सेंटरमध्ये गेले. यावेळी एक इसम त्या ठिकाणी उभा होता. महाजन यांनी पैसे काढण्यासाठी कार्ड टाकले. यावेळी तो इसम त्यांच्या बाजूला उभा राहिला. मशीनमधून पैसे न निघाल्याने महाजन एटीएम कार्ड काढत असताना ते निघाले नाही. त्यामुळे त्या इसमाने पुन्हा एटीएम पिन टाकण्यास आणि कार्ड न निघाल्याने एटीएम मशीन वर दिलेले हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क करून माहिती देण्यास सांगितले. त्यामुळे महाजन यांनी एटीएम पिन टाकला आणि हेल्पलाइन नंबर वर त्या इसमाने त्यांना मदतीसाठी सायंकाळी चार वाजता येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर महाजन तेथून निघून गेले. त्यानंतर मशीनमध्ये अडकलेले एटीएम कार्ड काढून एक लाख सहा हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली.

# मालेगावात मतदार मॅपिंगसाठी प्रशासनाचा मोठा उपक्रम; विशेष शिबिराला नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद!

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव शहरातील मतदार यादी अधिक अचूक व पारदर्शक करण्याच्या उद्देशाने मालेगाव शहरात बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) यांच्यासाठी विशेष मतदार मॅपिंग शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्रशासनाच्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून लोकशाही प्रक्रियेला अधिक बळकटी देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे.

या शिबिरास मालेगावचे नगराध्यक्ष ओमप्रकाश मधुकर खुरसडे, स्थानिक नगरसेवक तसेच गावातील मोठ्या संख्येने मतदार उपस्थित होते. विशेष म्हणजे माननीय उपविभागीय अधिकारी वैशालीताई देवकर यांनी स्वतः उपस्थित राहून शिबिराची पाहणी केली व संपूर्ण प्रक्रियेचे बारकाईने निरीक्षण केले. यावेळी वैशालीताई देवकर यांनी बीएलओंना मतदार मॅपिंगची अचूक अंमलबजावणी कशी करावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

वैशालीताई देवकर यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, प्रत्येक घरापर्यंत पोहोचून योग्य माहिती संकलित करणे अत्यंत आवश्यक आहे. नवीन मतदारांची नोंदणी, मृत व स्थलांतरित मतदारांची योग्य वगळणी



**मतदार नोंदणी प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी प्रत्येक बीएलओने जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे. प्रत्येक पात्र नागरिकाचा समावेश आणि अपात्रांची वगळणी अचूकपणे झाली, तरच निवडणूक प्रक्रिया पारदर्शक होईल. प्रशासन आणि नागरिक यांचा समन्वयच यशाची गुरुकिल्ली आहे, असा स्पष्ट संदेश देत काटेकोर काम करण्याचे आवाहन करण्यात आले.**

**— वैशालीताई देवकर**
**उपविभागीय अधिकारी वाशिम**

**लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित नसून त्यासाठी जागरूक नागरिकत्व आवश्यक आहे. प्रत्येकाने स्वतःहून पुढाकार घेऊन मतदार यादीत आपले नाव तपासावे, नोंदणी करावी आणि इतरांनाही प्रेरित करावे. समाजातील प्रत्येक घटक सहभागी झाल्यास लोकशाही अधिक सक्षम होईल,**

**— ओमप्रकाश मधुकर खुरसडे**
**युवा नगराध्यक्ष मालेगाव**

आणि डिजिटल मॅपिंग प्रक्रियेचा प्रभावी वापर केल्यास मतदार यादी अधिक सक्षम होईल. वैशालीताई देवकर यांनी बीएलओंना प्रामाणिकपणे काम करण्याचे आवाहन करत अचूक यादी हीच लोकशाहीची खरी ताकद असल्याचे अधोरेखित केले.

नगराध्यक्ष ओमप्रकाश मधुकर खुरसडे यांनी देखील शिबिराला भेट देऊन प्रशासनाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. नगराध्यक्ष ओमप्रकाश मधुकर खुरसडे यांनी नागरिकांना आवाहन करत सांगितले की, प्रत्येक पात्र नागरिकाने मतदार यादीत आपले नाव नोंदवून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा. त्यांच्या मते, नागरिकांचा सहभाग जितका वाढेल तितकी लोकशाही अधिक मजबूत होईल.

शिबिरादरम्यान नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेत विविध शंका उपस्थित केल्या, ज्यांचे समाधान बीएलओंनी तत्काळ केले. या प्रक्रियेमुळे मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत होण्यास मदत होणार आहे. वैशालीताई देवकर यांच्या उपस्थितीमुळे शिबिराला अधिक गांभीर्य प्राप्त झाले, तर नगराध्यक्ष ओमप्रकाश मधुकर खुरसडे यांच्या सहभागामुळे नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले.

एकूणच, प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्या एकत्रित सहभागातून मालेगावात राबविण्यात आलेले हे मतदार मॅपिंग शिबिर लोकशाही मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे.

# दिल्लीत नारी आरक्षणासाठी महिलांचा एल्गार; डॉ. शिल्पा पाठक ठाकूर आघाडीवर

**दैनिक युवक आधार**
**नवी दिल्ली वार्ताहर** : देशातील महिलांच्या हक्कांसाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या “नारी शक्ती वंदन अधिनियम 2023” (नारी आरक्षण विधेयक) तातडीने लागू करण्याच्या मागणीसाठी दिल्लीत महिलांनी एकत्र येत जोरदार आंदोलन छेडले. या आंदोलनातून पंतप्रधानांना पत्र पाठवून कोणताही बदल न करता हे विधेयक त्वरित अंमलात आणावे, अशी ठाम मागणी करण्यात आली.

या आंदोलनात डॉ. शिल्पा पाठक ठाकूर यांनी सक्रिय सहभाग नोंदवत महिलांच्या मागण्यांना ठोस स्वरूप दिले. त्यांच्या उपस्थितीमुळे आंदोलनाला अधिक धार प्राप्त झाल्याचे दिसून आले. महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या अध्यक्षा संध्याताई सव्वा लाखे यांच्यासह




विविध समाजघटकांतील महिलांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

डॉ. शिल्पा पाठक ठाकूर यांनी स्पष्टपणे मांडणी करताना सांगितले की, या विधेयकात अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि इतर मागासवर्गीय (OBC) महिलांसाठीही योग्य आरक्षणाची तरतूद असणे अत्यावश्यक आहे. महिलांना न्याय्य आणि समतोल प्रतिनिधित्व मिळण्यासाठी हे विधेयक तातडीने लागू करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

दरम्यान, अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा अलका लांबा यांनी देशभरात पोस्टकार्ड मोहिमेची घोषणा केली आहे. या मोहिमेंतर्गत “नारी शक्ती वंदन अधिनियम 2023 लागू करा — आज करा, आत्ताच करा” असा संदेश देत महिला मोठ्या प्रमाणावर पंतप्रधानांना पोस्टकार्ड पाठवणार आहेत. या उपक्रमालाही डॉ. शिल्पा पाठक ठाकूर यांनी ठाम पाठिंबा दर्शवला आहे.

देशभरातील महिलांचा आवाज केंद्र सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी सुरू असलेल्या या आंदोलनाला जुलै महिन्यात आणखी व्यापक स्वरूप दिले जाणार असल्याची माहिती समोर येत आहे.

डॉ. शिल्पा पाठक ठाकूर यांच्या नेतृत्वामुळे या लढ्याला नवी ऊर्जा मिळत असून, महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हा निर्णायक टप्पा ठरत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

# महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने सहाय्यक आयुक्त समाज कल्याण राजेंद्र जाधव यांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**
**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर :** दुर्बल घटकांचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास करून त्यांना सन्मानाने जगण्यासाठी सक्षम करणे, तसेच समाजातील उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणून समता आणि समान संधी उपलब्ध करून देणे या उद्दिष्टांसाठी काटेकोरपणे कार्य करणाऱ्या समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधव यांचा महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्ट, दर्यापूरच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला.

त्यांच्या रचनात्मक व विधायक कार्यातील भरीव कामगिरीच्या गौरवार्थ ट्रस्टच्या वतीने शाल, श्रीफळ व ॲड. मनोहर चलपे, नागपूर लिखित "मी सावित्री - माझी कर्म कहाणी" हे विचार पुष्प देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्ट ही आयएसओ नामांकन प्राप्त व नीती आयोग नोंदणीकृत एनजीओ आहे. या सन्मान सोहळ्याला ट्रस्टचे पदाधिकारी प्राचार्य निळकंठ बोरोळे, महासचिव रवींद्र ढोकणे, मुख्य संयोजक प्रदीप लांडे आदी मान्यवर प्रामुख्याने





उपस्थित होते. यावेळी सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधव यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेची प्रतिमा ट्रस्टला भेट दिली. ट्रस्टतर्फे राबविण्यात येणाऱ्या लोककल्याण विषयक व समाजपयोगी उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले व समाधान व्यक्त केले. सदर माहिती ट्रस्टचे प्रसिद्धी प्रमुख गजानन करूले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे

# इतिहासाचा अपमान की दिशाभूल?” – धीरेंद्र शास्त्री यांच्या वक्तव्यावरून संतापाची लाट

**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे** /भंडारा: धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संदर्भात केलेल्या कथित वक्तव्यामुळे राज्यात मोठा वाद निर्माण झाला असून भंडारा जिल्ह्यात संतापाची तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे. अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा उपाध्यक्ष ग्यानचंद ताराचंद जांभूळकर यांनी या प्रकरणी तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे.

जांभूळकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले



की, शिवाजी महाराजांच्या इतिहासाबाबत चुकीची व काल्पनिक माहिती पसरवून समाजात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. शिवाजी महाराजांचे कार्य, विचार आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व हे ऐतिहासिक पुराव्यांवर आधारित असून त्यामध्ये कोणतीही तोडमोड सहन केली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

नागपूर येथे झालेल्या कार्यक्रमात या वक्तव्याचा उल्लेख करताना, त्या कार्यक्रमास उपस्थित असलेले देवेंद्र फडणवीस यांनीही संबंधित इतिहास चुकीचा असल्याचे नमूद केल्याचे जांभूळकर यांनी सांगितले. त्यामुळे या प्रकरणी अधिक जबाबदारीने वक्तव्य करणे अपेक्षित होते, असेही त्यांनी म्हटले.

यावेळी जांभूळकर यांनी नागरिकांना आवाहन केले की, अंधश्रद्धा, चमत्कारांच्या दाव्यांपासून आणि खोट्या इतिहासापासून सावध राहावे. कोणत्याही दाव्याची वैज्ञानिक व तर्कशुद्ध पडताळणी करणे आवश्यक असून समाजाने विवेकाने निर्णय घ्यावा, असे त्यांनी सांगितले. तसेच, अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे समाजात गैरसमज पसरतात आणि ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांचा अपमान होतो, त्यामुळे संबंधितांवर योग्य कारवाई व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# २० वर्षांपासून दुर्लक्षित पांदण रस्ता; शेतकऱ्यांना मनस्ताप, नागरिकांचे हाल

**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे** लाखनी : लाखनी तालुक्यातील लाखोरी आलेसूर फाटा ते मानेगाव – लाखनी झोपडपट्टी दरम्यानचा पांदण रस्ता गेल्या तब्बल २० वर्षांपासून अत्यंत दयनीय अवस्थेत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. २००२-०३ साली केवळ माती टाकून काम उरकण्यात आले, मात्र त्यानंतर आजपर्यंत कोणतीही ठोस दुरुस्ती किंवा खडीकरण करण्यात आलेले नाही.

दरवर्षी पावसाळ्यात हा रस्ता पूर्णतः चिखलमय होऊन वाहतुकीस अयोग्य ठरतो, ज्यामुळे शेतकरी, मजूर, विद्यार्थी आणि नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. विशेषतः शेतमालाची वाहतूक ठप्प होते, रुग्णांना दवाखान्यात नेणे कठीण बनते, तर विद्यार्थ्यांचे शिक्षणही बाधित होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, ही परिस्थिती केवळ गैरसोय नसून प्रशासनाच्या दुर्लक्षाचे जिवंत उदाहरण आहे. अनेक वेळा मागणी करूनही संबंधित विभागाने कोणतीही ठोस पावले उचललेली नाहीत, ही बाब संतापजनक असल्याचे नागरिकांनी नमूद केले आहे. यासंदर्भात शेतकरी वर्गानेही ठोस मागण्या केल्या आहेत.सदर रस्त्याचे तात्काळ खडीकरण व मजबुतीकरण



करण्यात यावे, कामासाठी निश्चित कालमर्यादा जाहीर करण्यात यावी, कामातील विलंबाबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी.शेतकरी व नागरिकांनी इशारा दिला आहे की, जर लवकरात लवकर कामाला सुरुवात झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, ज्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील. आता जिल्हा व तालुका प्रशासन या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन तात्काळ कारवाई करते का? याकडे संपूर्ण परिसरातील जनतेचे लक्ष लागले आहे.

# नैना प्रकल्पाअंतर्गत भूखंडाचा ताबा देण्याबाबतची कार्यप्रणाली प्रसिद्ध करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : नैना प्रकल्पअंतर्गत भूखंडाचा ताबा देण्याबाबतची कार्यप्रणाली प्रसिद्ध करण्याची मागणी उसर्ली खुर्द ग्रामपंचायतच्या प्रभारी सरपंच अनिता नितीन भगत यांनी व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.उसर्ली खुर्द आणि आकुर्ली येथील सरपंच व प्रमुख ग्रामस्थांची बैठक झाली. उसर्ली खुर्द ग्रामस्थांनी नैना प्रकल्पाबाबत यापूर्वी सिडको प्रशासनाने आश्वासित केलेल्या विविध प्रलंबित प्रश्नाबाबत चर्चा झाली. तसेच योजनेअंतर्गत देय असलेल्या भूखंडाचे सीमांकन करून आवश्यक ती मोजणीबाबतची कागदपत्रांची फाईल देण्याबाबत चर्चा झाली. यावेळी भूखंड वितरित करण्याबाबत कोणतीही कार्यप्रणाली नसल्याचे निदर्शनास आले. त्या अभावी जानेवारी महिन्यात टीपीएस 7 मधील देवद येथील मोजणी केलेल्या भूखंडधारकांना आजपर्यंत प्रत्यक्ष ताबा देता आला नाही. नकाशात फेरबदल करण्यासाठी ऑगस्ट 2025 रोजी 60 पेक्षा जास्त निवेदन सादर केलेली आहेत. याबाबत कार्यवाही प्रलंबित आहे. उसर्ली खुर्द गावात प्रस्तावित रेल्वे आणि अस्तित्वात असलेली कर्जत पनवेल कॉर्ड रेल्वे लाईन आणि कोकण रेल्वेच्या हद्दीबाबत स्पष्टता नाही. सातबारा सदरी त्यांच्या नावासमोरील नमूद असलेल्या क्षेत्राप्रमाणे भूखंडाचे विभाजन करण्याची सोपी पद्धत कार्यप्रणाली प्रसिद्ध करण्यात यावी. योजनेत समाविष्ट असलेल्या सर्व भूखंड धारकांना देय असलेली अंतिम भूखंडांच्या बांधकाम परवानगीसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची फाईल देणे. बांधकाम परवानगी मिळण्यासाठी विमानतळ प्राधिकरण यांच्याकडून एनओसी तसेच गावठाण लगत पुनर्विकास बाबत युडीसीपीआर मधील काही तरतुदी लागू करणे. बांधकाम परवानगीसाठी एक खिडकी योजना करणे या सर्व कार्यवाही प्रलंबित असल्याचे ग्रामपंचायतीने दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# रजनीकांत बोरेले यांना १५ दिवसात निशुल्क माहीती देण्याचे शुभांगी राउत यांनी अपीलीय अधिकारी यांचा आदेश; मामला मुख्याधिकारी यांची खोटी सही

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे** : पांढरकवडा येथील प्रसिद्ध व्हिसल ब्लोअर आणि माहिती अधिकार कार्यकर्ते रजनीकांत डालूरामजी बोरेले यांनी नगर परिषदेच्या स्वछता विभागात कचरा हातगाडीच्या लक्षावधी रुपये काढण्याचा कट कारस्थानी करीता मुख्याधिकारी यांची खोटी सह्या कनिष्ठ अधिकारी यांनी केली होती. या प्रकरणात स्वछता अभियंता तथा माहिती अधिकारी आरोग्य विभाग नगर परिषद पांढरकवडा यांचेकडे रजनीकांत बोरेले यांनी दि.०२/०३/२०२६ ला माहिती अर्ज दाखल केला त्या माहिती अर्ज़ात मुख्याधिकारी यांची खोटी सही कोणी केली त्या कनिष्ठ अधिकारी यांचे नाव,पदनाम, आणि एकून किती कचरा हात गाडी व ऐकून देयक किती काढले आणि खोट्या सही करणाऱ्या विरुद्ध एफ.आय आर.केली काय ? अशी अनेक माहिती रजनीकांत बोरेले यांनी मागीतली होती.यावर माहिती अधिकारी शुभांगी स. राउत स्वछता अभियंता न.प.हिने कलम 8 (1) (h) अन्वये माहिती देता येत नही.चौकशी समिती स्थापन करुण चौकशी प्रक्रिया सध्या सुरु आहे असे शुभांगी राउत हिने दि.१०/०३/२०२६ रोजी पत्र द्वारे रजनीकांत बोरेले यांना कळविले या विरुद्ध प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. यांचेकडे लगेच रजनीकांत बोरेले यांनी अपील दाखल केली यावर दि.१०/०४/२०२६ रोजी सुनावनी ठेवण्यात आली.सुनावनी रजनीकांत डालूरामजी बोरेले यांनी लेखी युक्तिवाद दाखल केले त्यात अनेक गंभीर बाब उपस्थित केले त्यांनी युक्तिवाद मध्ये नमूद केले की अपीलार्थी रजनीकांत बोरेलेने मगितलेली माहिती भ्रष्टाचार आणि आर्थिक भ्रष्टाचार करण्याचे कट रचने,खोट्या सही करुण आर्थिक अपहार करण्याची कट कारस्थनी करने, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निधीचे भ्रष्टाचार करने म्हणजे भारतीय न्याय सहिंताचे प्रचलीत कायद्याच्या गंभीर गुन्हा सारखे कृत्य आहे. त्यावेळी चे मुख्यधिकारीचे खोट्या सही केले त्याच मुख्यधिकारीने सर्व प्रथम पोलीस स्टेशनला एफ.आय.आर नोंदविने कायदेशीर बाब होती.परंतु मुख्याधिकारी ने आजपावते गुन्हा दाखल केला नसून खोट्या सही करणाऱ्या कनिष्ट अधिकारीला अभय देत आहे. प्रस्तुत प्रकरणात मुख्याधिकारी सुद्धा कर्तव्यात कसूर करने, गंभीर गुह्यात एफ.आय.आर.नोंद केली नाही यात मुख्याधिकारी सह आरोपीच्या कार्यवाहिच्या पात्र आहे.

अश्या गंभीर प्रकरणात गुन्हा दाखल होवून त्याचा तपास पोलिसांनी केले पाहिजे कारण किती प्रकरणात असे ग़ैरप्रकार झाले आहे ते उघड़कीस आले असते परंतु गुन्हा नोंद केल्याने न.प.ग़ैरप्रकार उघड़कीस येतील आणि खोटी सही करणाऱ्या अधिकारीला अटक होवून



इतर अधिकारी सुद्धा अडकतील म्हणुन मुख्यधिकारीने एफ.आय. आर. नोंद केली नाही.या शिवाय चौकशी स्थापन मध्ये इतरसत वरिष्ठ विभागीय बदल अधिकारी उसने कायदेशीर आहे परंतु चौकशी समिती मध्ये समान व दैनदिन संप्रकात येणारे न.प.सम समान कर्मचारी आहे.त्या समितीला सुद्धा २ महीने झाले आहे. तरी देखील अतिशय गंभीर प्रकरणात चौकशी झालीच नाही.शुभांगी राउत हिने माहिती अधिकार 2005 चे कलम 8 (1),(h)चा चुकीचा अर्थ काढला आहे .रजनीकांत बोरेले यांनी मागितलेली माहिती गोपनीयता मध्ये मोडत नसून ती माहिती दिल्याने भारताच्या सार्वभौम किवा भारताच्या सुरक्षा आणि त्याचा गोपनियतेला ईजा पोहचेल अशी माहिती नाही आहे. शुभांगी राउत माहिती अधिकारी विरुद्ध कलम 20 (1) प्रमाणे कार्यवाही करुण निशुल्क माहिती अपीलार्थी रजनीकांत बोरेले यांना पुरविन्याचे आदेश पारित करावे असे लेखी युक्तिवाद दाखल केला होता.

प्रस्तुत प्रकरणात शुभांगी स राउत स्वछता अभियंता तथा महिती अधिकारी नगर परिषद पांढरकवडा यांचे युक्तिवाद आणि व्हिसल ब्लोअर तथा अपीलार्थी रजनीकांत डालूरामजी बोरेले यांचे लेखी युक्तिवाद चे अवलोकन करुण मुख्याधिकारी तथा प्रथम अपिलीय प्राधिकारी पंकज गावंडे यांनी रजनीकांत बोरेले यांचे लेखी युक्तिवाद ग्राह्य धरून १५ दिवसात निशुल्क माहिती देण्याचे आदेश पारीत केले आहे.

महत्वाची बाब म्हणजे न. प.च्या ग़ैरप्रकार विरूद्ध रजनीकांत बोरेले यांनी दोन याचिका वि. मुंबई उच्चन्यायलय खंड पीट नागपुर यात याचिका दाखल केली होती सध्या याचिका न्याय प्रविष्ट आहे हे विशेष.

# ऊर्जा परिवर्तनातून राज्याच्या सामाजिक व आर्थिक क्षेत्राला बळ; महावितरणचा दोन पुरस्कारांनी सन्मान

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये ऊर्जा परिवर्तनाद्वारे दिलेल्या विशेष योगदानाची दखल घेत महावितरणचा ‘मागेल त्याला सौर कृषिपंप’ योजनेसाठी ‘रिन्यूएबल एनर्जी इनिशिएटिव्ह ऑफ द इयर’ तसेच प्राधान्य दराच्या वीजखरेदीमध्ये 65 टक्के स्वस्त व शाश्वत अपारंपरिक ऊर्जेचा समावेश केल्याबद्दल ‘क्लीन एनर्जी अँड रिन्यूएबल अडॉप्शन अवॉर्ड’ने गौरविण्यात आले.

भविष्यातील सक्षम अर्थव्यवस्था घडविण्यासाठी इकॉनॉमिक टाइम्सने मुंबई येथे दोन दिवसीय महाराष्ट्र बिझनेस परिषदेचे आयोजन केले होते. त्यात शुक्रवारी (दि. 24) महावितरणचे कार्यकारी संचालक श्री. धनंजय औंढेकर, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश



कोहाट, तांत्रिक सहायक श्री. अमोल मोरे, माध्यम सल्लागार डॉ. दिनेश थिटे, सहायक अभियंता श्री. शुभम चोरमाळे यांनी हे पुरस्कार स्वीकारले.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार सन 2030 पर्यंत तब्बल 39 हजार 500 हजार मेगावॅट हरित ऊर्जेची भर पडणार आहे. पर्यायाने राज्याची नवीकरणीय ऊर्जेची क्षमता 13 टक्क्यांवरून 52 टक्के होणार आहे. या ऊर्जा परिवर्तनाला वेग देत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने प्राधान्य दरांवर अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत 47 हजार 347 मेगावॅट (65टक्के) वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. हरित ऊर्जेला प्राधान्य मिळाल्याने शेतकऱ्यांना दिवसा व स्वस्त वीज उपलब्ध होण्यास सुरवात झाली आहे. तर वीज खरेदीमध्ये 10 हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये 13 हजार 500 कोटींनी वार्षिक बोजा कमी होत आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होण्यास सुरवात झाली आहे. या कामगिरीसाठी महावितरणला ‘क्लीन एनर्जी अँड रिन्यूएबल अडॉप्शन अवॉर्ड’ने गौरविण्यात आले.

तसेच ‘मागेल त्याला सौर कृषिपंप’ योजनेद्वारे महाराष्ट्राने देशात अव्वल कामगिरी केली असून सर्वाधिक 9 लाख 17 हजार सौर पंप कार्यान्वित केले आहे. देशात सर्वाधिक 64 टक्के सौर कृषिपंप महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये 5 लाख 5 हजार (34 टक्के) सौर पंप कार्यान्वित झाले आहे. या योजनेतून केवळ 30 दिवसांत 45 हजार 911 सौर पंप कार्यान्वित करण्याच गिनिज वर्ल्ड रेकॉर्डने महावितरणला गौरविण्यात आले आहे. या योजनेतून सुमारे 42 लाख एकर शेतजमिनीच्या सिंचनासाठी दिवसा व मोफत वीजपुरवठा सुरु झाला आहे. त्याची दखल घेत या योजनेसाठी महावितरणला ‘रिन्यूएबल एनर्जी इनिशिएटिव्ह ऑफ द इयर’ पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# 'मिस्टर इंडिया फायनल' मध्ये झळकणार पनवेलचा भूमीपुत्र ब्रुशद मेटांगे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : पनवेलकरांच्या सन्मानात आणखी एका मोठ्या सन्मानाची भर पडते आहे. पनवेलचा भूमीपुत्र ब्रुशद मेटांगे उंचावेल केवळ पनवेलचीच नाही तर पूर्ण महाराष्ट्राची मान.

सामान्य परिवारातील होतकरू , एक जबाबदार फूट बॉल कोच मास्टर ब्रुशद मेटांगे महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करणार ! मिस्टर इंडिया फायनल ( पुरुष सौंदर्य ) प्रतियोगिते मध्ये..रुबरू च्या 2026 Mr INDIA या प्रतियोगिते मध्ये *ब्रुशद मेटांगे* यांची निवड झाली असून ही फायनल 2 मे 2026 ला गोवा येथे आयोजित केली आहे..

ब्रुशद एक सुसंस्कृत, सुसभ्य व आदर्शवादी व्यक्ती आहे आणि हा वारसा वडील लाईफ कोच बाळासाहेब ( कुमार ) मेटांगे यांच्याकडूनच त्याला मिळाला आहे.. वडील कुमार मेटांगे यांनी ब्रुशद ला एक जीवनोपयोगी मंत्र दिला की संघर्षमय यात्रा ही एक दिवस सागरा एवढं यश नक्की देते.. तेव्हा ब्रुशद हा पनवेलकरांचा मान ठेऊन महाराष्ट्राची शान




बनून या रुबरू 2026 च्या मिस्टर इंडिया फायनल मध्ये आपली योग्यता व प्रतिभा सिद्ध करणार..आपण सगळयांनी, अवघ्या महाराष्ट्राने त्याला इन्स्टा वर लाईक , कमेंट्स , शेअर आणि फॉलो अवश्य करा.. विसरू नका..तुमचं लाईक, कमेंट्स वोट म्हणून गृहीत धरलं जाईल..

# ठाणे ज्ञानराज सभागृहात श्री स्वामी समर्थ महाराज पादुका-पालखी सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : ठाणे येथील ज्ञानराज सभागृहात श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पादुका आणि पालखी सोहळ्याचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले. या सोहळ्यास मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून दर्शन घेतले.

कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि श्रद्धाभावाने साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेना (ठाकरे गट) ठाणे उपजिल्हा प्रमुख श्री प्रदीप शिंदे तसेच समस्त





कार्यकर्ते उपस्थित होते.तसेच अंक फिल्म सिटीतील सिनेकलाकार श्री गणेश दळवी आणि श्री विशाल ताटके यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.संपूर्ण सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडत भाविकांच्या मनात आनंद आणि समाधानाची भावना निर्माण झाली.

# विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहा, गोरगरिबांसाठी पत्रकारिता करा : डॉ. प्रा. राजेंद्र गोनारकर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे/नांदेड** : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथील माध्यमशास्त्र संकुलात आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. प्रा. राजेंद्र गोनारकर यांनी “विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि गोरगरिबांच्या प्रश्नांसाठी पत्रकारिता करावी,” असे आवाहन केले.

यावेळी ते पुढे म्हणाले की, पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नसून ती समाजसेवेचे प्रभावी माध्यम आहे. समाजातील वंचित, दुर्लक्षित घटकांचे प्रश्न शासनापर्यंत पोहोचवणे ही पत्रकारांची महत्त्वाची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांनी सत्य, प्रामाणिकपणा आणि निडरता या मूल्यांना जपून कार्य केल्यास पत्रकारितेत मोठे यश मिळवता येते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी या विचारांचे स्वागत करत टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजाभिमुख पत्रकारितेची जाणीव अधिक दृढ झाली असून, भविष्यात जबाबदार पत्रकार म्हणून कार्य करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कान्हा खानसोळे यांनी केले तर आभार विक्रांत हाटकर यांनी व्यक्त केले

# हॉस्पिटलमधील रोख रक्कम चोरणारा गजाआड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल शहरातील एका नामांकित हॉस्पिटलमधील रोख रक्कम चोरणाऱ्या आरोपीस पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सदर हॉस्पिटलमधील एमआरआय विभागात असलेले 51 हजार रुपये आरोपी रोहित अनिल भोसले (25 रा.सुकापूर) याने लबाडीने चोरुन नेले होते. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उपनिरीक्षक विनोद लभडे, पो.हवा.परेश पाटील, जयराम बांगर आदींच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा शोध घेतला असता सदर आरोपी हा वाजे गावात लपून बसल्याचे दिसल्याने त्या ठिकाणी छापा टाकून आरोपीला ताब्यात घेतले आहे. याबाबत पुढील तपास पो.हवा.जयराम बांगर करीत आहेत.

# नैसर्गिक शेती अभियानांतर्गत अमरावती विभाग स्तरीय कार्यशाळा अकोला येथे संपन्न !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : कृषि विभाग, महाराष्ट्र शासन व डॉ पंजाबराव देशमुख कृषि विदयापीठ अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत अमरावती विभाग स्तरीय एक दिवसीय कार्यशाळा दिनांक 25 एप्रिल 2026 रोजी दीक्षांत सभागृह, डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे उत्साहात पार पडली .

कार्यशाळेला विशेष आमंत्रीत खासदार श्री अनुप धोत्रे व आमदार श्री हरीश पिंपळे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे अध्यक्षस्थानी श्री डॉ शरद गडाख कुलगुरू डॉ, पंजाबराव देशमुख विद्यापीठ अकोला तर उदघाटक श्री सुनील बोरकर संचालक आत्मा व निविष्ठा गुणनियंत्रण हे होते . तर प्रमुख अतिथी डॉ धनराज उंदीरवाडे, संचालक (विस्तार व प्रशिक्षण )डॉ पं दे कृ वि, अकोला हे होते.

कार्यशाळेचे प्रास्ताविक करतांना श्री गणेश घोरपडे, अमरावती विभागीय कृषी सहसंचालक यांनी आजच्या बदलत्या परिस्थिती मध्ये नैसर्गिक शेतीचे महत्त्व व




नैसर्गिक शेती पद्धती चा शेतकऱ्यांनी कशा प्रकारे अवलंब केला पाहिजे या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे उदघाटक तसेच प्रमुख मार्गदर्शक श्री सुनील बोरकर, संचालक (आत्मा ) व निविष्ठा गुणनियंत्रण यांनी नैसर्गिक शेतीचे तंत्र व शेतकऱ्यांनी आता काही प्रमाणात का होईना नैसर्गिक शेतीची कास धरावी असेआवाहन केले. अध्यक्षीय भाषण करतांना मा कुलगुरू डॉ शरद गडाख यांनी नैसर्गिक शेती पद्धतीने विकसित केलेल्या कृषी विद्यापीठातील विविध प्रक्षेत्राबाबत माहिती दिली सदर प्रशेत्रावर शेतकऱ्यांनी आवर्जून भेट दयावी असे आवाहन केले. तांत्रिक मार्गदर्शन सत्रामध्ये प्रमुख मार्गदर्शक डॉ धनराज उंदीरवाडे, संचालक विस्तार डॉ पं दे कृ वि, अकोला यांनी विभागातील प्रमुख पिकावरील कीड व रोगव्यवस्थापन, क्रॉपसॅप प्रकल्प या बाबत सखोल मार्गदर्शन केले डॉ अनिता चोरे, विभागप्रमुख, नैसर्गिक शेती विभाग, डॉ पं दे कृ वि, अकोला डॉ योगेश इंगळे, वनस्पती रोग शास्त्रज्ञ् डॉ उमेश ठाकरे, ,प्रमुख शास्त्रज्ञ्, कृषी विज्ञान केंद्र, अकोला या सर्वांनी अनुक्रमे नैसर्गिक शेती संकल्पना, नैसर्गिक शेती मध्ये कीड व रोग व्यवस्थापण, शेतावर निविष्ठा निर्मिती व त्याचा वापर याबद्दल उपस्थित अधिकारी, कर्मचारी व शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

तसेच कृषि विद्यापीठ कार्यकारी सदस्य श्री शिवरामजी घोडके, यांनी नैसर्गिक शेती मधील स्वतः चे अनुभव सांगताना तीचे आरोग्यविषयी महत्व विषद केले. कार्यशाळे च्या शेवटच्या सत्रामधे विभागातील प्रत्येक जिल्ह्यातील एक प्रगतीशील शेतकरी यांनी नैसर्गिक शेतीमधील त्याचे यशस्वी प्रयोग व स्व अनुभव उपस्थिता समोर मांडले. ार्यशाळे ला विभागातील पाच ही जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा ),शेतीशाळेचे आयोजक व प्रेरक शेतकरी, नैसर्गिक शेती पद्धतीने शेती करणारे शेतकरी, महिला शेतकरी, कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी असे एकूण 2200 जनांची कार्यशाळे ला उपस्थिती होती कार्यशाळेचे सूत्रसंचालन सौ सीमा देशमुख, कृषी अधिकारी यांनी केले व शेवटी आभार प्रदर्शन डॉ मुरली इंगळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अकोला यांनी करून अध्यक्ष यांच्या परवानगीने कार्यशाळा संम्पन्न झाल्याचे जाहीर केले.

# भावपूर्ण निरोप : माध्यमशास्त्र संकुलातील विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे** : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत माध्यमशास्त्र संकुलात द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित निरोप समारंभ उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या दोन वर्षांच्या शैक्षणिक प्रवासातील आठवणींना उजाळा दिला. विविध सांस्कृतिक उपक्रम, भाषणे आणि अनुभव कथन यांमुळे वातावरण आनंदी तर कधी भावूक झाले. प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत पत्रकारितेच्या



क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करण्याचे मार्गदर्शन केले.

यावेळी द्वितीय वर्षातील सर्व विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून पत्रकारितेच्या क्षेत्रात पाऊल टाकण्यासाठी सज्ज झाल्याचे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनीही आपल्या मित्रपरिवाराबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, “या आठवणी आयुष्यभर सोबत राहतील,” अशी भावना व्यक्त केली.

समारोपाच्या वेळी सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. हा निरोप समारंभ सर्वांसाठीच अविस्मरणीय ठरला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माध्यम शास्त्र संकुलाचे संचालक डॉ. प्रा. सुहास पाठक तर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. राजेंद्र गोनारकर, सचिन नरंगले, डॉ. प्रा. कैलास यादव, प्रा गिरीश जोंधळे हे होते...!

सूत्रसंचालन कान्हा खानसोळे यांनी केले तर आभार विक्रांत हाटकर यांनी मानले...!

# भारताचे पहिले खाजगी कक्षीय रॉकेट ‘स्कायरूट विक्रम-1’ श्रीहरिकोटाहून झाले रवाना

## विक्रम-1 ला तेलंगणाचे मुख्यमंत्री श्री ए. रेवंत रेड्डी यांनी हैदराबाद येथून रवाना केले

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले मुंबई :** स्कायरूट एरोस्पेस द्वारे विकसित केलेले भारतातील पहिले खाजगीरित्या बांधणी केलेले कक्षीय रॉकेट विक्रम-1 ला तेलंगणाचे माननीय मुख्यमंत्री श्री ए.रेवंत रेड्डी यांनी हैदराबाद येथील कंपनीच्या मॅक्स-क्यू कॅम्पसवर औपचारिकरित्या रवाना केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून रॉकेटच्या श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातील प्रक्षेपण स्थळाकडे औपचारिक प्रस्थान ची नोंद झाली.कार्यक्रमाच्या एक भाग म्हणून माननीय मुख्यमंत्री यांनी रॉकेटच्या स्पेस-रेडी पेलोड फेअरिंगला समारंभपूर्वक हिरवा झेंडा दाखवला.

ही संरचना उड्डाणादरम्यान रॉकेटमधील उपग्रहाचे संरक्षण करते स्कायरूटच्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना तेलंगणा माननीय मुख्यमंत्री श्री ए.रेवंत रेड्डी म्हणाले,“हा प्रसंग तेलंगणाच्या एरोस्पेस क्षेत्रात जागतिक पातळीवर अग्रणी बनण्याच्या प्रयत्नांमधला एक महत्त्वाचा टप्पा आहे. सरकार जागतिक विद्यापीठे आणि उद्योगातील अग्रणी संस्थांबरोबर भागीदारी द्वारे एरोस्पेस क्षेत्रासाठी युवकांना कौशल्य प्रशिक्षण देण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. मजबूत धोरणे, पायाभूत सुविधा,




प्रतिभा आणि सक्षम परिसंस्था यांच्या बळावर आमचे सरकार स्कायरूटसारख्या कंपन्यांना पाठबळ देण्यासाठी वचनबद्ध आहे,”

कार्यक्रमात बोलताना पवन कुमार चंदना, स्कायरूट एरोस्पेसचे सह-संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले,“तेलंगणाचे माननीय मुख्यमंत्री श्री ए. रेवंत रेड्डी विक्रम-1 रॉकेटला स्पेसपोर्टकडे प्रस्थान करण्यासाठी फ्लॅग-ऑफ करण्याकरता लाभले याचा आम्हाला सन्मान वाटतो. या कक्षीय रॉकेटचे प्रक्षेपण भारताच्या उदयोन्मुख खाजगी स्पेस-टेक उद्योगासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. विक्रम-1 द्वारे, आम्ही वेगाने वाढणाऱ्या जागतिक बाजारपेठेसाठी ऑन-डिमांड उपग्रह प्रक्षेपण सक्षम करून अवकाश सर्वांसाठी खुले करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.”

विक्रम-1 च्या प्रक्षेपणासह स्कायरूट भारताचे पहिले खाजगी कक्षीय प्रक्षेपण करण्यासाठी सज्ज असून जागतिक स्तरावर सध्या मोजक्या कंपन्यांचे वर्चस्व असलेल्या बाजारपेठेत प्रवेश करत आहे.अवकाश परिसंस्थेत यामुळे कसा बदल घडेल यावर भर देताना स्कायरूट एरोस्पेसचे सह-संस्थापक आणि मुख्य कामकाज अधिकारी नागा भारत डाका म्हणाले,“आम्ही विक्रम-1 च्या सर्वात महत्त्वपूर्ण चाचण्या पूर्ण केल्या असून, या ऐतिहासिक प्रक्षेपणाच्या दिशेने पुढील आठवड्यात स्पेसपोर्टवर एकत्रीकरण आणि प्रक्षेपण मोहिमेच्या उपक्रमांना सुरुवात करण्यास आम्ही उत्सुक आहोत.”

विक्रम-1 हे एक बहु-स्तरीय कक्षीय प्रक्षेपण वाहन असून 350 किलोग्राम पर्यंतच्या लहान उपग्रहांना लो अर्थ ऑर्बिटमध्ये प्रक्षेपित करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. सात मजली इमारती इतक्या उंचीचे हे रॉकेट पूर्णतः कार्बन कॉम्पोझिट संरचनेने बनवलेले आहे आणि यामध्ये इन-हाऊस विकसित प्रोपल्शन सिस्टिम्सचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये 3D-प्रिंटेड इंजिन्स आणि उच्च-थ्रस्ट सॉलिड फ्युएल रॉकेट बुस्टर समाविष्ट आहेत. हे प्रक्षेपण IN-SPACe च्या अधिकृततेखाली आणि इस्रोच्या तांत्रिक देखरेखीखाली पार पडले आहे. आगामी उड्डाण हे विक्रम-1 च्या अनेक नियोजित मोहिमांपैकी पहिले आहे. त्यामुळे स्कायरूटला जगभरातील उपग्रह ऑपरेटरसाठी नियमित व्यावसायिक प्रक्षेपण ऑपरेशन्सकडे टप्प्याटप्प्याने प्रगती करणे शक्य होऊ शकेल.

# आपली बस, आपली सेवा १ मे पासून एसटीचे नवे अभियान - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक युवक आधार**

**मुंबई ( प्रतिनिधी ) :** महाराष्ट्राच्या जनजीवनाशी नाळ जोडलेली लालपरी आता नव्या उमेदीनं, नव्या शिस्तीनं आणि नव्या संवेदनशीलतेनं प्रवासाला सज्ज होत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने “आपली बस आपली सेवा” या व्यापक अभियानाच्या माध्यमातून प्रवासी सेवेला एक नवी दिशा देण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमाची घोषणा राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली आहे. त्यानुसार एसटी महामंडळाच्या उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी सविस्तर परिपत्रक जारी केले आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी बसेसची संख्या वाढत असली, तरी प्रवासीसंख्या आणि महसूल अपेक्षेप्रमाणे वाढत नसल्याची जाणीव महामंडळाने गांभीर्याने घेतली आहे. याच जाणिवेतून प्रवाशांचा विश्वास पुन्हा दृढ करण्यासाठी आणि सेवेला मानवी स्पर्श देण्यासाठी हे अभियान राबविण्यात येणार आहे.

**सेवेतून संस्कार, शिस्तीतून विश्वास**

या अभियानांतर्गत चालक आणि वाहक हे केवळ कर्मचारी न राहता ‘सेवक’ बनणार आहेत. बस ताफ्यात समाविष्ट करण्यापूर्वी तिची स्वच्छता, वेळेआधी फलाटावर उपस्थिती, नीटनेटका गणवेश आणि शिस्तबद्ध वर्तन यांना आता केवळ नियमांची चौकट नसून, सेवाभावाची ओळख मानली जाणार आहे.

बस सुटण्यापूर्वी चालकाने स्वतःची ओळख करून देत प्रवाशांना प्रवासाचा मार्ग, थांबे आणि अपेक्षित वेळ याची माहिती देणे—हा केवळ औपचारिक भाग नसून, प्रवाशांशी नातं जोडण्याचा एक सुसंवादी प्रयत्न असेल. प्रवासादरम्यान मदतीचा हात पुढे करणारा चालक-वाहक हा एसटीचा खरा चेहरा ठरेल.

**प्रवासीही सेवेचे सहप्रवासी**

या अभियानात प्रवाशांनाही समान सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. स्वच्छता राखणे, मौल्यवान वस्तूंची जबाबदारी स्वतः घेणे, तसेच मोठे सामान योग्य ठिकाणी ठेवणे—या साध्या सवयी प्रवास अधिक सुखकर बनवतील.

तसेच एनसीएमसी स्मार्ट कार्डचा वापर आणि ऑनलाइन आरक्षणाचा स्वीकार ही आधुनिकतेकडे टाकलेली पावले ठरतील.

**अडचणीतही आधार, सेवेतही सातत्य**

बस रद्द होणे किंवा मार्गात अडथळे निर्माण होणे या अनपेक्षित परिस्थितींमध्ये प्रवाशांना तत्काळ पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. बसस्थानके आणि परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि सुसज्ज ठेवण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात आली आहे.

**तक्रारींवर तत्पर उपाय**

प्रवाशांच्या तक्रारींना केवळ नोंद न मानता, त्यांचे तत्काळ निराकरण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येणार आहे. प्रत्येक स्तरावर नियमित आढावा घेत, सेवेतील उणिवा दूर करण्यावर भर दिला जाणार आहे.

**नव्या विश्वासाचा प्रवास**

१ मे २०२६ पासून राज्यभर राबविण्यात येणारे हे अभियान केवळ सेवा सुधारण्याचा उपक्रम नसून, एसटी आणि प्रवासी यांच्यातील विश्वासाचा नवा सेतू ठरणार आहे. लालपरीच्या चाकांना आता केवळ वेग नाही, तर संवेदनशीलतेचीही दिशा मिळणार आहे. “आपली बस, आपली सेवा” हा मंत्र प्रत्यक्षात उतरला, तर प्रत्येक प्रवास हा केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याचा मार्ग न राहता—एक सुखद, सन्मानपूर्वक आणि समाधानकारक अनुभव ठरेल. असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथील तीन विद्यार्थ्यांची NMMS शिष्यवृत्ती करिता निवड

**दैनिक युवक आधार**

**राजू शिंदे उपसंपादक महाराष्ट्र :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा ही शाळा स्पर्धा परीक्षा चे केंद्र बनले आहे महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या सर्व शालेय स्पर्धा परीक्षांमध्ये या शाळेतील विद्यार्थी पात्र झालेले आहेत . यामध्ये शिष्यवृत्ती परीक्षा , नवोदय परीक्षा , एनएमएमएस परीक्षा या स्पर्धेमध्ये विद्यार्थी पात्र होत आहेत. तसेच यावर्षी जिल्हास्तरावर प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांचा द्वितीय क्रमांक सुद्धा आलेला आहे. या विद्यार्थ्यांना स्पोर्ट किटचे बक्षीस मिळालेले आहे . तसेच यावर्षी इयत्ता आठवी करिता महाराष्ट्र शासनाच्या वतीने एन एम एम एस परीक्षा घेण्यात आली या परीक्षेमध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक




शाळा दुधा केंद्र किर्ला तालुका मंठा जिल्हा जालना येथील तीन विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती करता निवड झालेली आहे यामध्ये सार्थक खुळे भाग्यश्री शिंदे व स्नेहल जाधव या तीन विद्यार्थ्यांना पुढील चार वर्ष बारा हजार रुपये प्रमाणे 48000 रुपये स्कॉलरशिप मिळणार आहे . या सर्व विद्यार्थ्यांचे व या स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेणारे शाळेचे मुख्याध्यापक श्री विजय कांगणे सर सहाय्यक शिक्षक श्री निलेश पिसे सर व पंजाब दांदडे सर यांचे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री गोविंद चव्हाण साहेब शिक्षण विस्ताराधिकारी श्री केजी राठोड सर किर्ला केंद्राचे केंद्रप्रमुख श्री खरात सर तसेच शाळा व्यवस्थापन समिती दुधा, ग्रामपंचायत कार्यालय दुधा व पालकांनी अभिनंदन केले

# युनिव्हर्सल इन्फ्रा होम्स; कार्यालयाचा उद्घाटन सोहळा पार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** नवीन पनवेल येथे रविवार दि. 26 एप्रिल 2026 रोजी सकाळी 11 वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत फीत कापून कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवरांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटोचे पूजन करून दिपप्रज्वलन करून वंदन करण्यात आले या उद्घाटन सोहळ्यासाठी पनवेल तालुक्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते विशेष करून रियल इस्टेट क्षेत्रामध्ये काम करणारे बिल्डर्स अँड डेव्हलपर्स,चॅनेल पार्टनर, एजंट तसेच आंबेडकरी चळवळीत काम करणारे अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून युनिव्हर्सल इन्फ्रा होम्स च्या सर्व संचालकांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी युनिव्हर्सल इन्फ्रा होम्स ग्रुप तर्फे उपस्थित मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात




आले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत संचालक सुधीर पवार, अमित साळवी, सुनील वानखडे, संतोष गोटे, प्रभाकर सावंत, संजय फडके, आनंद जाधव, प्रल्हाद गायकवाड यांच्याकडून करण्यात आले यावेळी या पनवेल परिसरामध्ये आपले हक्काचे घर बजेटमध्ये मिळवून देण्याचे काम युनिव्हर्सल इन्फ्रा होम्स चे सर्व टीम करणार असल्याचे राज सदावर्ते यांनी प्रसार माध्यमांना बोलताना सांगितले, सर्व उपस्थित मान्यवरांनी या ग्रुपला त्यांच्या नवीन वाटचालीबद्दल शुभेच्छा दिल्या.

# अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे वर्गीकरण नोकरी किंवा शिक्षण एवढेच मर्यादित न ठेवता राजकीय क्षेत्रात सुद्धा लागू करा -पत्रकार तथा समाजसेवक संजीव भांबोरे

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे :** नागपूर-जिल्ह्यातील कुही तालुक्यातील खैरलांजी येथे जेतवन बुद्ध विहार, तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीचे अनावरण दिनांक 26 एप्रिल 2026 ला भदंत विनयबोधि महाथेरो, भदंत नागसेन, भदंत संघानंद, श्रामनेर बुद्धपाल, शांतीवन बुद्ध विहार चिचाळ चे संचालक जीवन बोधी बौद्ध, प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे, विनय ढोके सहसचिव भारतीय




बौद्ध महासभा नागपूर, गंगाधर गजभीये धम्म प्रचारक नागपूर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. भिक्खू संघ यांच्या उपस्थितीत धम्मदेशना देण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना पत्रकार तथा समाजसेवक संजीव भांबोरे म्हणाले की, अनुसूचित जाती आरक्षणाच्या वर्गीकरणाच्या नावावर भांडण लावण्याचे काम सुरू असून भारतीय संविधानाने कलम 341 नुसार सर्व 59 जातींना एक संघ बांधण्याचे काम केले .परंतु आता त्यात फुट पाडून आरक्षणाचा लाभ एका विशिष्ट जातीलाच म्हणजे फक्त बौद्ध समाजाला मिळाला असा गैरसमज समाजात निर्माण करण्याचे काम सुरू आहे .आरक्षणाचे वर्गीकरण नोकरी किंवा शिक्षण यापुरतेच मर्यादित न ठेवता राजकीय क्षेत्रात सुद्धा ते लागू झाले पाहिजे असे मत सुद्धा त्यांनी यावेळी व्यक्त केले. आता लवकरच जात निहाय

जनगणना होत असून बौद्ध समाजाने अनुसूचित जातीच्या रकान्यात जात महार व बौद्ध धर्म लिहिला तरच बौद्धांची संख्या भारताच्या राज्यपत्रात वाढेल. यावेळी उपस्थित भिक्खु संघ यांना चिवरदान करण्यात आले. त्याचप्रमाणे सर्व बौद्ध उपासक-उपासिका यांना भोजनदान देण्यात आले . यावेळी चेतवन बुद्ध विहाराला विनय ढोके यांनी पुरातन कालीन भिक्खूनीचे जीवन, डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि संदेश पुस्तक भेट देण्यात आली.कार्यक्रम यशस्वी करण्याकरता आशिष मेश्राम, प्रमोद वासनिक, शारदा बनसोड करुणा महाजन, विजय बनसोड, प्रदीप बनसोड ,यांनी सहकार्य केले.

# आश्वासनपूर्तीची प्रचिती;कळंबोली परिसरातील कचरा व ड्रेनेज समस्येवर तात्काळ कारवाई, नगरसेवक रामदास शेवाळे यांचे नागरिकांकडून कौतुक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिका कळंबोली प्रभाग क्रमांक ८ मधील के.एल.२ सेक्टर ५ परिसरात कचरा साचणे आणि ड्रेनेज लाईन बंद होण्याच्या समस्येमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. दुर्गंधी, अस्वच्छता आणि आरोग्याच्या समस्या वाढण्याची भीती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर स्थानिक रहिवाशांनी नगरसेवक रामदास शेवाळे यांच्याकडे निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. नागरिकांच्या तक्रारीची गंभीर दखल घेत नगरसेवक शेवाळे यांनी केवळ आश्वासन देऊन



थांबण्याऐवजी प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन परिस्थितीची पाहणी केली. “आश्वासनपूर्ती आणि प्रत्यक्ष काम” या भूमिकेची प्रचिती देत त्यांनी तत्काळ पनवेल महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून समस्येची माहिती दिली आणि त्वरित कारवाईचे निर्देश दिले.

त्यांच्या पुढाकारामुळे प्रशासनाने कोणताही विलंब न करता के.एल.२ परिसरात स्वच्छता मोहीम हाती घेतली. साचलेला कचरा तातडीने हटवण्यात आला असून बंद पडलेल्या ड्रेनेज लाईनची दुरुस्तीही युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहे. यामुळे परिसरातील अस्वच्छता कमी होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सध्या या भागात साफसफाई आणि ड्रेनेज दुरुस्तीची कामे वेगाने सुरू असून परिस्थितीत लक्षणीय सुधारणा होत असल्याचे दिसून येत आहे. स्थानिक रहिवाशांनी नगरसेवक शेवाळे यांच्या तत्परतेचे आणि कार्यक्षमतेचे कौतुक करत मनापासून आभार व्यक्त केले आहेत. या तातडीच्या कारवाईमुळे परिसरातील स्वच्छता सुधारण्यास मदत होणार असून भविष्यात अशा समस्या निर्माण होऊ नयेत यासाठी प्रशासनाने नियमित देखरेख ठेवावी,अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. नगरसेवक शेवाळे यांनीही नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले आहे.

# भंडाऱ्यात काँग्रेसचे आंदोलन जाहीर ; शिवाजी महाराजांच्या कथित अपमानाविरोधात तीव्र भूमिका

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे भंडारा** - भंडारा जिल्हा काँग्रेस कमिटी व जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या कथित अपमानाविरोधात सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ रोजी आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भात विश्राम गृह, भंडारा येथे दुपारी ३ वाजता सभा होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. यावेळी वाचाळ धिरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाबाबत केलेल्या कथित वादग्रस्त वक्तव्याचा निषेध करण्यात येईल. काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आरोप केला आहे की, या कार्यक्रमावेळी भाजप व रा. स्व संघाचे संघप्रमुख व प्रमुख नेते उपस्थित होते, त्यामुळे त्यांनीही या प्रकरणात भूमिका आपली स्पष्ट करावी.काँग्रेसने आपल्या मागण्यांमध्ये नमूद केले आहे की, धिरेंद्र शास्त्री यांचा निषेध करून त्यांना महाराष्ट्रात कार्यक्रम करण्यास बंदी घालावी तसेच भाजपच्या संबंधित नेत्यांनी सार्वजनिकरीत्या माफी मागावी.याशिवाय, आंदोलनात महिला आरक्षण विधेयक २०२३संदर्भातही महत्त्वाची मागणी करण्यात आली आहे. केंद्र सरकारने कोणतीही परिसीमन अट न लावता हे विधेयक तात्काळ लागू करावे, अशी भूमिका काँग्रेसने घेतली आहे.

भंडारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मोहन पंचभाई व जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा जयश्री बोरकर यांनी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.